## योगींचा शपथविधी; दुसऱ्यांदा बनले यूपीचे मुख्यमंत्री

**लखनऊ :** योगी आदित्यनाथ हे सलग दुसऱ्यांदा उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री बनले आहेत. हजारो समर्थकांच्या साक्षीने दोन उपमुख्यमंत्री आणि ५० मंत्र्यांसह योगींचा शानदार शपथविधी शुक्रवारी (दि. २५) झाला. या सोहळ्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, गृहमंत्री अमित शाह उपस्थित होते. त्याचप्रमाणे विविध क्षेत्रांतील दिग्गजांची उपस्थिती लाभली. उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुकीत पराभूत झालेल्या केशवप्रसाद मौर्य यांना भाजपने दुसऱ्यांदा उपमुख्यमंत्रिपदाची संधी दिली आहे. मौर्य यांच्यासह ब्रजेश पाठक यांनीही उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. योगी मंत्रिमंडळात पहिल्या टर्ममधील काही चेहरे कायम ठेवण्यात आले असून या वेळी काही चेहरे नव्याने सहभागी करण्यात आले आहेत.



शनिवार, २६ मार्च २०२२ ◆ वर्ष १४ ◆ अंक २४७
www.ramprahar.com

# राम प्रहर

◆ पाने ६ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

**अंतरंग**

'आधी शेतकरी आणि एसटी कर्मचाऱ्यांना पैसे द्या'/२

रायगडात शिक्षण विभागाची तब्बल ४७ पदे रिक्त/५

उरणच्या आर्य पाटीलने मांडवा ते गेट वे अंतर केले पार/६

### आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांच्याकडून

# अधिवेशनात पुन्हा 'दिबां'च्या नावाचा गजर

**मुंबई, पनवेल : रामप्रहर वृत्त**

आयुष्याच्या शेवटपर्यंत भूमिपुत्र, प्रकल्पग्रस्त, शेतकऱ्यांना केंद्रस्थानी ठेवून त्यांच्या भविष्यासाठी लढणारे संघर्षमूर्ती लोकनेते दि. बा. पाटीलसाहेब यांचेच नाव नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला देऊन प्रकल्पग्रस्त भूमिपुत्रांचा सन्मान करा, अशी आग्रही मागणी पुन्हा एकदा आमदार प्रशांत ठाकूर यांनी, तर शंभर प्रकल्पांना बाळासाहेब ठाकरे यांचे नाव द्या, पण नवी मुंबई विमानतळाला फक्त आणि फक्त 'दिबा'साहेबांचे नाव पाहिजे, अशी जोरदार मागणी आमदार महेश बालदी यांनी विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात आठवडा प्रस्तावावर बोलताना सभागृहात केली. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांनी 'दिबा'साहेबांच्या कारकिर्दीचा आलेख सभागृहात मांडतानाच 'दिबा'साहेबांचेच नाव का हवे या संदर्भात भूमिपुत्रांची विस्तृत भूमिका मांडत विधानसभेत पुन्हा 'दिबां'च्या नावाचा गजर केला.

> "संघर्षमूर्ती लोकनेते दि. बा. पाटीलसाहेब यांचे नाव नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला देऊन प्रकल्पग्रस्त भूमिपुत्रांचा सन्मान करा.
> –आमदार प्रशांत ठाकूर




> शंभर प्रकल्पांना बाळासाहेब ठाकरे यांचे नाव द्या, पण नवी मुंबई विमानतळाला फक्त आणि फक्त 'दिबा'साहेबांचे नाव पाहिजे.
> –आमदार महेश बालदी"

सभागृहात बोलताना आमदार प्रशांत ठाकूर यांनी म्हटले की, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सिडकोच्या माध्यमातून निर्माण केले जात आहे. हे विमानतळ बनवणारी सिडको मुळामध्ये १९७० साली नवी मुंबईच्या निर्मितीसाठी या ठिकाणी आली. १९७० सालच्या संपादनामध्ये ठाणे, रायगड जिल्ह्यातील संपूर्ण ९५ गावांचे गावठाण संपादित केले जाणार होते. त्या ९५ गावांचे गावठाणांसह स्थलांतर करण्याची योजना होती. त्या वेळी लोकनेते दि. बा. पाटीलसाहेब स्थानिकांच्या बाजूने उभे राहिले. ते पाच वेळा विधानसभेचे आमदार, दोन वेळा खासदार, एक वेळा विधान परिषदेचे आमदार, १९७२ ते १९७७पर्यंत या सदनाचे विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र शेतकरी सभेचे अध्यक्ष होते. त्यांनी सीमाप्रश्नी एक वर्षाचा कारावास भोगला. १९८४ साली जासई येथे आंदोलन पेटले त्या पनवेल आणि उरण जमीन बचाव समितीचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले आहे. देदीप्यमान कारकीर्द असलेले 'दिबा'साहेबांचे कार्य या सदनाला माहीत आहे. त्यामुळे वेगळे सांगण्याची गरज नाही. १९८४ साली शेतकऱ्यांचे आंदोलन दाबून टाकण्यासाठी गोळीबार झाला. दोन दिवसांत पाच शेतकरी हुतात्मे झाले. 'दिबा'साहेबांनी आयुष्यभर शेतकऱ्यांसाठी लढा दिला, त्या शेतकऱ्यांनी वीट वीट जोडून त्यांना घर बांधून दिले आणि त्या घराचे नाव संग्राम आहे. या घरामध्ये देवाचे फोटो नाहीत, तर पाच हुतात्म्यांचे फोटो लावलेले आहेत. शेतकऱ्यांना केंद्रस्थानी ठेवून आयुष्यभर ते लढले. ज्या भूमीवर हा लढा लढला ती जमीन सिडकोने जेएनपीटीला देऊ केली. त्या जेएनपीटीच्या प्रकल्पग्रस्तांना आजही साडेबारा टक्के भूखंड मिळाले नाहीत.

'दिबा'साहेबांनी आयुष्याच्या शेवटपर्यंत रुग्णवाहिकेतून जाऊन आंदोलन करून संघर्ष केला. शेतकऱ्यांच्या जीवनात परिवर्तन घडावे म्हणून त्यांनी प्रयत्न केले. ते आगरी समाजाचे नेते होते. आगरी समाजातील खर्चिक चालीरीती, रूढी, परंपरा बदलण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले आणि म्हणून प्रकल्पग्रस्तांच्या ते हृदयात आहेत. भूमिपुत्रांनी शेतकऱ्यांनी त्यांना दैवत मानले असून आज त्यांचा भूमिपुत्र एकवटला आहे. आम्ही मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना विनंती केली होती, पण त्यांनी ऐकले नाही, असे आमदार प्रशांत ठाकूर यांनी सभागृहात नमूद करतानाच मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराचा प्रश्न १२ वर्षे चालला. नवी मुंबई विमानतळाच्या नावाचा विषय आला तेव्हा ठाणे, रायगड, मुंबईतील सर्व भूमिपुत्र एकवटला आहे. अनेक प्रकल्प होत आहेत आणि होतील त्यांना बाळासाहेब ठाकरे यांचे नाव देता येईल, पण नवी मुंबई ही 'दिबा'साहेबांची जन्मभूमी आणि कर्मभूमी आहे. त्यामुळे येथील विमानतळाला फक्त दि. बा. पाटीलसाहेबांचेच नाव दिले पाहिजे व त्यासाठी आम्ही संघर्ष करीत राहणार आहोत, असेही त्यांनी सभागृहात राज्य सरकारला ठणकावून सांगितले. **(पान २ वर..)**

## मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंकडे 'टोमणे बॉम्ब'-फडणवीस

**मुंबई : प्रतिनिधी**

सध्या रशिया-युक्रेन युद्ध सुरू आहे. युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष नाटोकडे मदत मागताहेत. त्याऐवजी त्यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंकडे मदत मागितली असती, तर बरे झाले असते, कारण मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याकडे असे शस्त्र आहे, असा बॉम्ब आहे जो सगळ्यांवर भारी आहे तो म्हणजे 'टोमणे बॉम्ब'. टोमण्यांशिवाय त्यांच्या भाषणात काहीच नव्हते, अशा शब्दांत विधानसभा विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरेंच्या भाषणाची सभागृहात खिल्ली उडवली.



विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मुख्यमंत्री उद्धव ठाकरे मराठी शाळा बंद झाल्या त्याबद्दल बोलले नाही. कोविड काळात सर्वांत जास्त रुग्ण आणि मृत्यू महाराष्ट्रात झाले त्यावर काही बोलले नाहीत. **(पान २ वर..)**

## अनिल परब यांचे रिसॉर्ट तुटणार! हिंमत असेल, तर अडवून दाखवा!!

### किरीट सोमय्यांचे ठाकरे सरकारला खुले आव्हान

**मुंबई : प्रतिनिधी**

महाविकास आघाडी सरकारमधील मंत्री आणि शिवसेना नेते अनिल परब यांच्या दापोलीतील अनधिकृत रिसॉर्टवर कारवाईसाठी भाजप नेते माजी खासदार किरीट सोमय्या शनिवारी (दि. २६) कार्यकर्त्यांसोबत मोर्चा घेऊन जाणार आहेत. यावरून सोमय्या यांनी राज्यातील उद्धव ठाकरे सरकारला खुले आव्हान दिले आहे.

'अनिल परब यांचे बेकायदा रिसॉर्ट पाडण्याचा आदेश आल्यानंतरही उद्धव ठाकरे यांचे सरकार पाडत नाहीत. ते पाडण्यासाठी आम्ही उद्या सकाळी मुलुंडहून निघणार आहोत. आम्ही दापोली समुद्रकिनाऱ्यापर्यंत जाणार. पुन्हा एकदा उद्धव ठाकरेंच्या माफिया सरकारने धमक्या द्यायला सुरुवात केली आहे की, किरीट सोमय्यांना दापोलीला येऊन देणार नाही. उद्धव ठाकरेंच्या माफिया सरकारमध्ये हिंमत असेल, तर आम्हाला अडवून दाखवावे. अनिल परबांचे रिसॉर्ट तुटणारच,' असे किरीट सोमय्या यांनी म्हटले आहे.

## पनवेल महापालिकेला शासनाने योग्य जीएसटी अनुदान द्यावे; आमदार प्रशांत ठाकूर यांची मागणी

पनवेल महापालिकेला राज्य शासनाने योग्य जीएसटी अनुदान द्यावे, अशी मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात केली आहे. पॉईंट ऑफ इन्फर्मेशननुसार त्यांनी माहितीवजा हा मुद्दा उपस्थित केला.

पनवेल महापालिकेची स्थापना २०१६ साली झाली. त्यानंतर जीएसटीचे अनुदान मिळावे यासाठी तत्कालीन आयुक्तांनी शासनाकडे चुकीची कागदपत्रे दाखल केली. त्यामुळे जीएसटी अनुदान कमी मिळत होते आणि आता त्यात आणखी कपात करण्यात आल्याने महापालिकेचे प्रचंड नुकसान होत आहे. जीएसटी अनुदान २८.८९ कोटी रुपयांऐवजी सात कोटी व त्यानंतर आता ते चार कोटी शासनाने केले आहे. त्यामुळे महापालिकेला आर्थिक संकटाचा सामना करावा लागतोय. हे लक्षात घेत शासनाने पनवेल मनपाला योग्य जीएसटी अनुदान देणे गरजेचे आहे, असे आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले.

## निवडक

### सुरक्षा सल्लागार डोवाल यांचा चीनच्या परराष्ट्रमंत्र्यांना इशारा

**नवी दिल्ली :** भारत दौऱ्यावर असलेले चीनचे परराष्ट्रमंत्री वांग यी यांनी राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांच्याशी चर्चा केली. या वेळी डोवाल यांनी वांग यी यांना, लडाखच्या उर्वरित भागातून सैन्य तत्काळ मागे घेण्यात यावे, त्याशिवाय द्विपक्षीय संबंध सामान्य होणार नाहीत, असे स्पष्टपणे सांगितले. दरम्यान, चर्चा पुढे नेण्यासाठी वांग यी यांनी डोवाल यांना चीन भेटीचे निमंत्रण दिले आहे.

### शिवसेना खासदाराने मागितली ब्राम्हण समाजाची जाहीर माफी

**औरंगाबाद :** शेंडी-जानव्याचे हिंदुत्व आम्हाला मान्य नाही, असे वादग्रस्त वक्तव्य करणारे शिवसेना खासदार विनायक राऊत यांनी ब्राम्हण समाजाची जाहीर माफी मागितली आहे. राऊत यांनी तत्काळ समाजाची माफी मागावी; अन्यथा दशक्रिया विधी करण्यात येईल, असा इशारा ब्राह्मण सेवा संघाने दिला होता.

## ईडीचा पुन्हा एकदा प्रताप सरनाईकांना दणका



### ११.३५ कोटींची संपत्ती जप्त

**ठाणे : प्रतिनिधी**

शिवसेना नेते आमदार प्रताप सरनाईक पुन्हा एकदा सक्तवसुली संचालनालयाच्या (ईडी) रडारवर आले आहेत. ईडीने नॅशनल स्पॉट एक्स्चेंज लिमिटेड (एनएसईएल) घोटाळाप्रकरणी सरनाईक यांची ठाण्यातील जमीन आणि दोन फ्लॅट जप्त केले आहेत. मनी लॉण्डरिंग प्रतिबंध कायद्यानुसार करण्यात आलेल्या या कारवाईत ईडीने सरनाईकांची ११.३५ कोटींची संपत्ती जप्त केली आहे.

मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने एनएसईएल प्रकरणात त्यांचे संचालक, प्रमुख अधिकारी, २५ डिफॉल्टर आणि इतरांवर दाखल केलेल्या गुन्ह्याच्या आधारे ईडीने मनी लॉण्डरिंगचा तपास सुरू केला आहे. आरोपींनी गुंतवणुकदारांची फसवणूक करण्यासाठी गुन्हेगारी कट रचल्याचा आरोप आहे. गुंतवणूकदारांना एनएसईएलच्या प्लॅटफॉर्मवर व्यापार करण्यास प्रवृत्त करणे, बनावट कागदपत्रे तयार करणे, खोटी खाती तायर करणे आणि त्याद्वारे फसवणूक केल्याचा आरोप आहे. १३ हजार गुंतवणूकदारांची ५६०० कोटींची फसवणूक केल्याची माहिती ईडीने दिली.

## माणगावात अल्पवयीन मुलीवर बलात्कार

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील विळे गावच्या हद्दीत एका १३ वर्षीय अल्पवयीन आदिवासी मुलीवर गुरुवारी (दि. २४) दुपारी बलात्काराची घटना घडली. या प्रकरणी फरार झालेल्या नराधमाविरोधात माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार घटनेतील फिर्यादी यांची मुलगी तिच्या मैत्रीणीसोबत बागेत गेली असता गुलाबी रंगाचा टी-शर्ट घातलेला, जाडा व काळ्या रंगाच्या अनोळखी व्यक्तीने पीडितेवर बलात्कार केला व तेथून तो पसार झाला. या घटनेची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात झाली असून आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस पथक फरारी नराधमाचा शोध घेत आहे.

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते कांडपिळे ग्रुपच्या पेट्रोल पंपाचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कांडपिळे ग्रुपच्या वतीने पनवेलजवळील सुकापूर येथे नव्याने पेट्रोल पंप सुरू करण्यात आला आहे. अजय कांडपिळे आणि गौरव कांडपिळे यांच्या या पेट्रोल पंपाचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते गुरुवारी (दि. २४) उद्घाटन झाले.



पेट्रोल पंपाच्या उद्घाटन सोहळ्याला भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, काँग्रेसचे रायगड जिल्हा अध्यक्ष महेंद्र घरत, भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष जयंत पगडे, उपमहापौर सीताताई पाटील, ड प्रभाग समिती सभापती अॅड. वृषाली वाघमारे, नगरसेवक संतोष शेट्टी, तेजस कांडपिळे, नगरसेविका चारुशीला घरत, राजश्री वावेकर, सुशीला घरत, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, सुकापूर ग्रामपंचायतीच्या सरपंच योगिता पाटील, अजय कांडपिळे, गौरव कांडपिळे, अजिंक्य कांडपिळे, अॅड. श्रद्धा कांडपिळे, डॉ. श्रद्धा कांडपिळे, वैभव देशमुख यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि कांडपिळे कुटूंबातील सदस्य व मित्र परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता.

या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी कांडपिळे परिवाराचा व्यवसायाचा वारसा ही पिढी यशस्वीपणे पुढे नेत आहे, असे प्रतिपादन केले आणि त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## आजपासून आयपीएल 'रन'संग्राम

### चेन्नई वि. कोलकाता सलामीची लढत रंगणार

**मुंबई : प्रतिनिधी**

सर्वाधिक लोकप्रिय क्रीडा स्पर्धा इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल)च्या १५व्या हंगामाचा थरार शनिवार (दि. २६)पासून सुरू होणार असून सलामीला गतविजेता चेन्नई सुपर किंग्ज आणि कोलकाता नाईट रायडर्स हे दोन संघ भिडणार आहेत.



आयपीएलमधील सर्व लढती मुंबई, नवी मुंबई आणि पुण्यात होणार आहेत. साखळी फेरीत ७० सामने होणार असून त्यापैकी २० लढती मुंबईतील वानखेडे मैदानावर, १५ ब्रेबॉर्न स्टेडियमवर, २० नवी मुंबईतील डी. वाय. पाटील स्टेडियमवर आणि १५ पुण्यातील महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन स्टेडियमवर होतील. स्पर्धा २९ मेपर्यंत चालणार आहे.

### यंदा 'दस का दम'

आयपीएलमध्ये यंदा दोन नव्या संघांची एण्ट्री झाल्याने एकूण १० संघांमध्ये चुरस असणार आहे. यामध्ये मुंबई इंडियन्स, कोलकाता नाइट रायडर्स, राजस्थान रॉयल्स, दिल्ली कॅपिटल्स, चेन्नई सुपर किंग्ज, सनरायजर्स हैदराबाद, रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू, पंजाब किंग्ज, लखनऊ सुपर जायंट्स आणि गुजरात टायटन्स यांचा समावेश आहे.



## रोह्यातील लाचखोर सहाय्यक गटविकास अधिकारी जाळ्यात

**रोहा : प्रतिनिधी**

रोहा पंचायत समितीचे सहाय्यक गटविकास अधिकारी पंडित कौरू राठोड यांना १० हजारांची लाच घेताना शुक्रवारी (दि. २५) कार्यालयात रंगेहाथ पकडण्यात आले. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या रायगड पथकाने ही कारवाई केली. यामुळे रोह्यात खळबळ उडाली आहे.

तक्रारदार यांच्याविरोधात नवी मुंबईतील कोकण भवन येथे चौकशी सुरू होती. या चौकशीसाठी सहाय्यक गटविकास अधिकारी पंडित राठोड यांना सादरकर्ता अधिकारी म्हणून नेमले होते. तक्रारदारच्या बाजूने अहवाल पाठविण्यासाठी राठोड यांनी त्यांच्याकडे १५ हजार रुपयांची मागणी करून २८ फेब्रुवारी रोजी यातील पाच हजार रुपये स्वीकारले होते. राठोड यांनी उर्वरित १० हजार रुपयांची मागणी तक्रारदाराकडे केली असता तक्रारदाराने राठोड यांच्याविरोधात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली.

तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस अधीक्षक पंजाबराव उगले, उपअधीक्षक सुषमा सोनावणे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक रणजीत गलांडे, हवालदार कौस्तुक मगर, नाईक विवेक खंडागळे, जितेंद्र पाटील, स्वप्नाली पाटील यांनी शुक्रवारी सापळा रचला. या वेळी तक्रारदाराकडून उर्वरित १० हजार रुपयांची लाच घेताना सहाय्यक गटविकास अधिकारी पंडित राठोड यांना पंचांच्या समक्ष कार्यालयात पकडण्यात आले. या प्रकरणी अधिक तपास सुरू आहे.

## कामोठ्यात भव्य मिसळ महोत्सव

### सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन



(छाया : लक्ष्मण ठाकूर)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कामोठे भाजपतर्फे आयोजित भव्य मिसळ महोत्सवाचे उद्घाटन गुरुवारी (दि. २४) पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. हा महोत्सव २७ मार्चपर्यंत चालणार असून यामध्ये खवय्यांना वेगवेगळ्या चविष्ट मिसळींचा आस्वाद घेता येणार आहे.

भाजप कामोठे शहर मंडल अध्यक्ष रवींद्र जोशी आणि युवा नेते हॅप्पी सिंग यांनी भव्य मिसळ महोत्सवाचे आयोजन पोलीस ठाण्यासमोरील मैदानात केले आहे. या ठिकाणी प्रवेश विनामूल्य आहे.

या महोत्सवाच्या उद्घाटन समारंभास भाजप कामोठे शहर मंडल अध्यक्ष रवींद्र जोशी, नगरसेवक दिलीप पाटील, विजय चिपळेकर, विकास घरत, डॉ. अरुणकुमार भगत, नगरसेविका कुसुम म्हात्रे, पुष्पा कुत्तरवडे, भाजप नेते के. के. म्हात्रे, आर. बी. म्हात्रे, गोपीनाथ गोवारी, भाऊ भगत, प्रकाश पाटील, युवा नेते हॅप्पी सिंग, महिला मोर्चा मंडल अध्यक्ष वनिता पाटील, भटक्या विमुक्त जमाती महिला आघाडी जिल्हाध्यक्ष विद्या तामखडे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

दरम्यान, महापौर डॉ. कविता चौतमोल यांनी मिसळ महोत्सवास भेट देऊन आयोजकांना शुभेच्छा दिल्या.

# आधी शेतकरी आणि एसटी कर्मचाऱ्यांना पैसे द्या

## भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी सरकारला सुनावले



**मुंबई : प्रतिनिधी**

माझे मुंबईत घर नाही तरीही आमदारांना मोफत घरे देणे मला मान्य नाही. सरकारने आमदारांना घरे देण्यापूर्वी शेतकऱ्यांना व एसटी कर्मचाऱ्यांना पैसे द्यावेत, असे भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी महाविकास आघाडी सरकारला सुनावले.

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आमदारांना मुंबईत ३०० घरे कायमस्वरुपी देण्याची घोषणा केली आहे. त्याबद्दल शुक्रवारी विधानभवनाच्या प्रांगणात चंद्रकांत पाटील बोलत होते.

चंद्रकांत पाटील म्हणाले की, आमदार सोडून जातील आणि सरकार पडेल, अशा भीतीने आमदारांवर वर्षाव करणे सुरू आहे. मतदारसंघाचा विकासनिधी मुळात दरवर्षी दोन कोटी रुपये होता, तो कोरोनाच्या काळात चार कोटी केला व आता पाच कोटी रुपये केला. आमदारांच्या ड्रायव्हरचा आणि सहाय्यकाचा पगार वाढविला, आमदारांना घरे देणार, अशी घोषणा केली. कशासाठी घर पाहिजे? माझे मुंबईत घर नाही. तरीही मी आग्रही असेन की, तुम्ही मला जे घर देणार त्या पैशामध्ये शेतकऱ्यांना पैसे द्या, एसटी कर्मचाऱ्यांना पैसे द्या. माझ्यासारखे काहीजण वगळले तर अनेकांची घरे आहेत. घरे विकत घेण्याची त्यांची क्षमता आहे. त्यामुळे तुम्ही शेतकऱ्यांना पैसे द्या, एसटी कर्मचाऱ्यांना पैसे द्या, मग आमदारांना घरे द्या, असा आक्रमक पवित्रा चंद्रकांत पाटील यांनी घेतला.

## अलिबाग नगर परिषद व राजिपमधील माजी सदस्यांच्या नावाचे फलक उतरविले

**अलिबाग : प्रतिनिधी**

सामाजिक कार्यकर्ते संजय सावंत यांनी अलिबाग नगर परिषदेच्या मुख्याधिकारी अंगाई साळुंखे यांची भेट घेतली. प्रशासकाचा कारभार येऊन तीन महिने उलटूनही कार्यकाळ पूर्ण झालेल्या नगरसेवकांचे फलक दर्शनी भागात दिसत असल्याबाबत हरकत घेतली होती. त्यानंतर प्रशासकांनी हे फलक काढून टाकले आहेत. रायगड जिल्हा परिषदेतही माजी सदस्यांच्या नावाचे फलक काढून टाकण्यात आले.

राज्यातील अनेक महापालिका, नगरपालिका व जिल्हा परिषदा यांचा कार्यकाळ पूर्ण झाल्याने त्यांचा कारभार प्रशासकाच्या ताब्यात गेला आहे, तर अनेक नगरसेवक, जि. प. सदस्य माजी झाले आहेत. सावंत यांनी याबाबत हरकत घेतली असता मुख्याधिकाऱ्यांनी फलक लवकरात लवकर काढून टाकण्यात येतील, असे आश्वासित केले होते. त्याप्रमाणे त्यांनी माजी सदस्यांच्या नावाचे फलक आता काढून टाकले आहेत, अशी माहिती सावंत यांनीच दिली.


**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**e-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification.

| Sr. No. | Tender No. | Description | Estimated cost in Rs. |
|---|---|---|---|
| 1 | SE/EHV/(O&M)CIR/PNL/ e-Tender 4/2022-23 **RFx No. 7000022855** | Hiring of vehicle for Superintending Engineer, EHV (O&M) Circle, Panvel for F.Y. 2022-23. | Rs. 7.20 Lakhs |

EMD 1% of estimated cost & Tender fee Rs.500/- + GST for each tender. **Submission of bids from 25.03.2022 at 18:30 Hrs. to 31.03.2022 at 15:30 Hrs. (Technical) Bid opening date and time from 31.03.2022 at 15:30 Hrs. and (Commercial) bid opening on 01.04.2022 at 15:00 hrs. if Possible.**

For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/**

**Contact Person:** The Executive Engineer (Adm) Mob: No. 9167026141

**Note :** All eligible suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

Sd/-
**SUPERINTENDING ENGINEER**
**EHV (O&M) CIRCLE, PANVEL**



**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E –TENDER NOTICE**

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification.**

| S.N. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No.: 7000022791** **Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/e-Tender-17/2022-2023** RFx e-tender for work of tree cutting work of various 100kV & 220kV Lines under EHV Lines S/Dn Panvel under EHV(O&M) Division Panvel. **Tender amount Limited to Rs. 11,55,009/-,** **EMD amount Rs. 11,550/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **25.03.2022, 18:00 Hrs. to 03.04.2022, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 03.04.2022 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **04.04.2022 at 11:00 hrs.(if Possible)** |

**Tender fees Rs.500/- + GST**

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**

**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.

**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

SD/-
**(M.C.JOSHI)**
**EXECUTIVE ENGINEER**
**EHV(O&M) DN PANVEL**


## कर्जत तालुक्यात शाळा पूर्वतयारी अभियान

**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील सर्व सरकारी शाळांमध्ये शाळा पूर्वतयारी अभियान राबविली जाणार आहे. यामध्ये गावस्तरावर पालक, शिक्षक, अंगणवाडी सेविका, तरुण स्वयंसेवक, ग्रामस्थ व शासन यांच्या संयुक्त प्रयत्नाने जून २०२२ मध्ये इयत्ता पहिलीत प्रवेश घेणाऱ्या मुलांसाठी विशेष उपक्रम शाळा पूर्वतयारी अभियान शाळेच्या आत आणि बाहेर होणार आहे. यामुळे मागील दोन वर्षांचे शैक्षणिक नुकसान भरून निघू शकेल.



इयत्ता पहिलीत दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांची तयारी होऊ शकेल आणि एनइपी २०२० अंमलबजावणीस प्रारंभ होईल या अनुषंगाने जिल्हाशिक्षण विभाग आणि प्रशिक्षण संस्था पनवेल तसेच शिक्षण विभाग गट, साधन केंद्र पंचायत समिती कर्जत यांच्या संयुक्त विद्यमाने तालुकास्तरीय शाळा पूर्वतयारी अभियान प्रशिक्षण आयोजित केले होते. या प्रशिक्षणास कर्जत पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी सुरेखा हिरवे आणि केंद्रप्रमुख मोहन पाटील यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले. तर प्रशिक्षण तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून मालू गायकवाड व किसन घावट होते. या प्रशिक्षणात कर्जत तालुक्यातील २१ केंद्रातून ४२ शिक्षकांनी उपस्थित राहून शाळा पूर्वतयारी रॅली काढली. सदर प्रशिक्षण यशस्वी होण्यासाठी रामचंद्र एनकर, सुनील राणे, विषय साधन व्यक्ती प्रतीक्षा तायडे, कर्जत आयईडी समन्वयक आणि बीआरसी टीम पंचायत समिती नविद हाशमी व शाळेचे मुख्याध्यापक राजेंद्र धोत्रे यांचा नियोजनात सहभाग होता.

## विझ किड्स प्री स्कूलच्या फन फेअरचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उलवे नोड सेक्टर ५ येथे विझ किड्स प्री स्कूलच्या फन फेअरचे उद्घाटन भाजपच्या उलवे नोड महिला मोर्चाच्या अध्यक्ष योगिता भगत यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी उलवे नोडच्या महिला मोर्चाच्या उपाध्यक्ष सुजाता पाटील, सुमन पाटील, विझ किड्स प्री स्कूलच्या प्रिन्सिपल नम्रता साने, टीचर दीक्षा नगदिवे, जयश्री शेळके, सोनाली ठोसर, अश्विनी सागर, पालकवर्ग आणि विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या योगिता भगत यांनी, हे प्री स्कूल म्हणजे मुलांच्या सर्वांगिण विकासावर भर देते. तसेच हे स्कूल म्हणजे मूलांचे दुसरे घर आहे, असे सांगितले.




महाराष्ट्र शासन
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,सा.बां.विभाग, पनवेल
पिनकोड-४१०२०६
E-mail- panvel.ee@mahapwd.gov.in
दूरध्वनी क्रमांक ०२२- २७४५२७७८ फॅक्स — ०२२-२७४६७४४०
ई- कार्यप्रणाली अंतर्गत ई-निविदा क्र. ८८ (ई-निविदा) सन २०२१-२२ (फेर निविदा क्र.१)

सार्वजनिक बांधकाम (सा.बां.) विभाग, पनवेल हे (दुरध्वनी क्र. ०२२- २७४५२७७८ फॅक्स — ०२२-२७४६७४४०) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडील नोंदणीकृत कंत्राटदाराला योग्य त्या कामांकरीता बी-१ नमुन्यातील निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागविणेत येत आहे. सदरची ऑनलाईन ई-निविदा सुचना www.mahapwd.com and www.mahatenders.gov.in पोर्टलवरती उपलब्ध आहे.
टिप- या निविदे मध्ये एकूण ०२ काम समाविष्ठ असुन ऑनलाईन निविदा विक्री व बीड प्रिपरेशन दिनांक २८.०३.२०२२ सकाळी १०.०० ते दिनांक ०८.०४.२०२२ रोजी सायंकाळी १८.०० पर्यंत संकेत स्थळावर उपलब्ध करुन देणेत आलेली आहे. www.mahatenders.gov.in

ई-निविदाजा.क्र./सा.बां./पनवेल/ १२०४
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सा.बां.विभाग, पनवेल, जि.रायगड
दिनांक :- १७/०३/२०२२

कार्यकारी अभियंता,
सा.बां.विभाग, पनवेल


## आयपीएलमुळे नवी मुंबईत वाहतूक पोलिसांची नवीन नियमावली

### सामन्यांच्या दिवशी ठिकठिकाणी नो पार्किंग झोन

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नेरुळ येथील डी. वाय. पाटील स्टेडियम येथे रविवारपासून (दि. २७) आयपीएल २०२२ चे एकूण २० सामने खेळविले जाणार आहेत. हे सामने पाहण्यासाठी प्रेक्षक मोठ्या संख्येने येणार असल्याने स्टेडियम परिसरात वाहतूक कोंडी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे २७ मार्च ते १८ मे या कालाधीत नेरुळ परिसरातील शनिमंदिर कमान, डी. वाय पाटील हॉस्पिटल, शनिमंदिर टी पॉईंट, पाणीपुरवठा चौक, आर. आर. पाटील उद्यान या मार्गांवर नो पार्किंग झोन तयार करण्यात आले आहेत.

नेरुळ येथील डी. वाय. पाटील स्टेडियम येथे आयपीएलचे २० सामने खेळविले जाणार आहेत. या सामन्यांदरम्यान शनिमंदिर कमान, डी. वाय. पाटील हॉस्पिटल, शनिमंदिर टी पॉईंट, पाणीपुरवठा चौक, आर. आर. पाटील उद्यान या मार्गांवर पार्किंगची वेगळी सोय नसल्याने वाहतूक कोंडी होण्याची शक्यता आहे. तसेच यामुळे रुग्णवाहिका, अग्नीशमन अशा अत्यावश्यक सेवा असलेल्या वाहनांना अडथळा निर्माण होऊ शकतो. यामुळे अपघाताची शक्यताही नाकारता येत नाही. त्यामुळे या सामन्यांदरम्यान वरील मार्गांवर नो पार्किंग झोन तयार करण्यात आले आहेत. नागरिकांनीही यासाठी पोलिसांना सहकार्य करावे, असे आवाहन नवी मुंबई वाहतूक नियंत्रण विभागातर्फे करण्यात आले आहे.

पान १ वरून

## आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांच्याकडून अधिवेशनात पुन्हा 'दिबां'च्या नावाचा गजर

या वेळी आमदार महेश बालदी म्हणाले की, कोरोनाच्या काळात पूर्ण देश कोरोनाने होरपळत होता आणि सर्वांत जास्त मृत्यू मुंबईत होत असताना सिडको महामंडळाने नवी मुंबई आंतराष्ट्रीय विमानतळाला बाळासाहेब ठाकरे यांचे नाव देण्याचा प्रस्ताव केला, मात्र सर्व भूमिपुत्र आणि स्थानिक जनतेची इच्छा आहे की, विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव दिले पाहिजे. त्यामुळे बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाचा हा प्रस्ताव स्थानिक आणि भूमिपुत्रांच्या भावनेच्या विरुद्ध होता. साडेबारा टक्के भूखंडाचे तत्व ज्यांनी महाराष्ट्राला दाखविले त्या दि. बा. पाटीलसाहेबांचे नाव नवी मुंबई विमानतळाला लागले पाहिजे ही भूमिपुत्रांची भावना लक्षात न घेता ऑनलाइन पद्धतीने सिडकोने ठराव केला आहे आणि तो ठराव विखंडित करावा, याकरिता गेल्या जून महिन्यापासून किमान १० वेळा आंदोलने झाली आणि स्थानिक जनतेच्या रेट्याला घाबरून राज्य सरकारने अजून तो कॅबिनेटमध्ये आणला नाही.

माझी या प्रस्तावाच्या माध्यमातून राज्य सरकारला विनंती आहे की, बाळासाहेब ठाकरे मोठे होते. त्यांचे या प्रकल्पाव्यतिरिक्त शंभर ठिकाणच्या प्रकल्पांना नाव द्या, पण नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला फक्त आणि फक्त दि. बा. पाटीलसाहेबांचे नाव द्या. स्थानिक जनता, भूमिपुत्र, प्रकल्पग्रस्त आणि लोकप्रतिनिधींची ही मागणी आहे आणि ही बाब शासनाने लक्षात घ्यावी, असेही आमदार महेश बालदी यांनी या वेळी नमूद केले.

## मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंकडे 'टोमणे बॉम्ब'-फडणवीस

मंत्री नवाब मलिकांचे समर्थन उद्धव ठाकरे करताहेत. बाकी जाऊ द्या, पण मलिक यांनी बॉम्बस्फोटातील आरोपीकडून जमीन खरेदी केली, जो आरोपी आजही जेलमध्ये आहे. ते खोट्या कागदपत्रांच्या आधारे दहशतवाद्यांशी व्यवहार करताहेत. ते पैसे हसीना पारकरला चाललेत. या गोष्टींचे समर्थन मुख्यमंत्री करतात त्याचे अतिशय दु:ख आहे.

शिखंडीला पुढे करणारी आम्ही औलाद नाही. आम्ही समोर लढणारे लोकं आहोत. प्रभू श्रीकृष्ण, रामचंद्राचे नाव सांगणारे आहोत. कपटाने राज्य कौरवांनी घेतले होते, पांडवांनी नाही. आमच्यासाठी सत्ता अंतिम लक्ष्य नाही, असे जोरदार प्रत्युत्तरही या वेळी देवेंद्र फडणवीसांनी उद्धव ठाकरेंना दिले.

## विधवेच्या खात्यातील रक्कम लंपास

**पनवेल : वार्ताहर**

एका विधवा महिलेच्या एटीएम कार्डचे क्लोनिंग करून बँक खात्यातील पतीच्या पीएफचे सुमारे १ लाख ३० हजार रुपये काढून घेतल्याची घटना कामोठे वसाहतीमध्ये घडली. अनिता कांबळे, रा. सेक्टर २२ यांच्या पतीचे निधन झाल्यानंतर पीएफ तसेच पगाराची दोन लाखांची रक्कम त्यांना मिळाली होती. ही रक्कम त्यांनी कामोठे येथील सेंट्रल बँक ऑफ इंडिया येथे ठेवली होती. त्यांना पैशाची गरज लागल्यास एटीएम कार्डचा वापर करून त्या पैसे काढत होत्या.

नुकतेच मुलींच्या शाळेची फी भरायची असल्याने त्यांनी पैसे काढण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यांच्या खात्यात पैसे नसल्याचे समजले. याबाबत बँकेत त्यांनी चौकशी केली असता त्यांच्या खात्यातील ऑनलाईन १ लाख ३० हजार रुपये काढण्यात आल्याची बँकेकडून सांगण्यात आले. त्यामुळे आपली फसवणूक झाल्याची तक्रार कामोठे पोलीस ठाण्यात केली आहे.

## उड्डाणपूल व सर्व्हिस रोडकरिता जागेची गरज

### एमआयडीसीशी महापालिकेची चर्चा

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिका क्षेत्रातील मुख्य ठाणे–बेलापूर रस्त्यावर भविष्यात वाहतूक नियोजनाच्या दृष्टीने सर्व्हिस रोड तयार करणे तसेच उड्डाणपूल बांधण्याकरिता महानगरपालिकेस जागेची आवश्यकता भासणार आहे. याकरिता महानगरपालिका व एमआयडीसी यांची संयुक्त बैठक आयुक्त अभिजीत बांगर यांनी घेत चर्चा केली.

एमआयडीसीला ठाणे–बेलापूर रस्त्यानजिक कोपरखैरणे–महापे भागात सर्व्हिस रोडशेजारी छोटे भूखंड वाटप करण्याचा निर्णय घेतला होता. हे भूखंड वाटप केल्याने रस्त्यावर गाड्यांची पार्किंग होऊन या भागात वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागेल अशी शक्यता वर्तविली जात होती.

या अनुषंगाने महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी एमआयडीसीच्या स्थानिक क्षेत्रीय अधिकाऱ्यांची बैठक आयोजित करून वरिष्ठ पातळीवर याबाबत पाठपुरावा करण्याची सूचना केली. या वेळी एमआयडीसीचे नवी मुंबईतील क्षेत्रीय अधिकारी सतीश बागल, महानगरपालिकेचे शहर अभियंता संजय देसाई व मालमत्ता विभागाचे उपायुक्त जयदीप पवार उपस्थित होते.

सद्य स्थितीत एमआयडीसीकडून महानगरपालिका क्षेत्रासाठी पुरविल्या जात असलेल्या पाणीपुरवठ्यामध्ये ५ ते ७ द. ल. लि. पाणी कमी मिळत असल्याने ऐरोली, समता नगर, साईनाथ वाडी, ऐरोली नाका तसेच एमआयडीसी बाजूकडील दिघा, घणसोली व तुर्भे विभागातील काही भागात पाणी पुरवठा कमी होत असल्याबाबत नागरिकांकडून विचारणा होत आहे.


या अनुषंगाने एमआयडीसीने नियोजित पाणी पुरवठा पूर्णपणे करावा असे आयुक्तांमार्फत सूचित करण्यात आले व यावर एमआयडीसीमार्फत आवश्यक कार्यवाही करण्याचे क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी मान्य केले.

**दुखवटा**

## धर्मा म्हात्रे



**रोहे** : तालुक्यातील झोळांबे येथील धर्मा नामदेव म्हात्रे यांचे वयाच्या ७६ व्या वर्षी निधन झाले आहे. भातसई झोळांबे परिसरात नोकरदारसह कष्टकरी शेतकरी म्हणून धर्मा नामदेव म्हात्रे यांची ओळख होती. शेतीसह दुग्ध व्यवसायही चांगल्या पद्धतीने त्यांनी केला. त्यांच्या पश्चात एक भाऊ, तीन मुले, एक मुलगी, पुतणे, नातू असा परिवार आहे.


पनवेल भाजपतर्फे
**जनहितार्थ**
माहितीसाठी

**पनवेल महानगरपालिका हद्दीत**
**शनिवार, दि. २६ मार्च २०२२ रोजी होणारे**
**कोरोना प्रतिबंधक लसीकरण**
**(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)**

**कोविशिल्ड**

**सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट :** १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी–१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. आय.टी.एम. कॉलेज, नवीन पनवेल
- ३. यूपीएचसी–४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ४. यूपीएचसी–५, डी–मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ५. यूपीएचसी–६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे
- ६. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर

**कोव्हॅक्सिन**

- ७. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली (१८+)
- ८. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली (१८+ ते १५+)
- ९. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल (१८+)
- १०. आय.टी.एम. कॉलेज, नवीन पनवेल (१५+ ते १८+)
- ११. यूपीएचसी–५, डी–मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर (१५+ ते १८+)

**कार्बेव्हॅक्स**

- १२. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल (१२ ते १४)

**Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पुर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.**

## निवडक

### सतीश गायकवाड सन्मानित

**पनवेल** : महाराष्ट्र पोलीस दलातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल २०२० या वर्षात जाहीर झालेल्या राष्ट्रपती पोलीस पदकाने राजभवन येथे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सतीश गायकवाड यांना राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या हस्ते गौरविण्यात आले. १९९२ साली पोलीस दलात उपनिरीक्षकपदी निवड झालेले गायकवाड हे त्यावेळी ६१९ विद्यार्थ्यांमधून तिसरे आले होते. ठाणे जिल्ह्यात ठाणे, कल्याण, भिवंडी येथे विविध पोलीस ठाण्यात त्यांनी सेवा बजावली. २०१२ साली पोलीस महासंचालक सन्मानचिन्ह देऊन त्यांना गौरवण्यात आले आहे. पोलीस सेवेत ३५ वर्षे सेवा केलेल्या सतीश गायकवाड यांना गायन आणि ट्रेकिंगचा छंद आहे. आतापर्यंत त्यांना ५०० हून अधिक बक्षिसे मिळाली आहे. या पोलीस पदकाबद्दल सर्व स्तरांतून त्यांचे अभिनंदन होत आहे.



### दाऊदी बोहरा समाजाचा उपक्रम

**पनवेल** : जागतिक चिमणी दिनानिमित्त नुकतेच पनवेल येथे दाऊदी बोहरा समाज ५३ वे धर्मगुरू डॉ. सैयदना मुफद्दल सैफूद्दीन यांच्या आदेशानुसार ३०० बर्ड फिडर्सचे वाटप करण्यात आले. या वेळी अली सरगर व्होरा, सैफूद्दिन व्होरा, अलिअसगर गोलवाला, कुसई पनवेलवाला, अली चित्तलवाला, सैफूद्दिन पनवेलवाला आदी उपस्थित होते. नैसर्गिक वनस्पती आणि जीवजंतूंच्या ऱ्हासामुळे त्यांची संख्या सातत्याने कमी झाली आहे. हे लक्षात घेऊन, दिवंगत प. पू. डॉ. सैयदना मोहम्मद बुरहानुद्दीन साहेब दाऊदी बोहरा समाजाचे ५२ वे धर्मगुरू बुरहानी फाउंडेशन अंतर्गत २०२१ मध्ये एक कार्यक्रम सुरू केला. त्याअंतर्गत बर्ड फिडर्सचे वाटप करण्यात आले.

### पनवेलमध्ये उपचारादरम्यान वृद्धाचा मृत्यू

**पनवेल** : पनवेल परिसरात एका ६० वर्षीय वृद्धाचा उपजिल्हा रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला असून त्याच्या नातवोईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत. या वृद्धाचे नाव संतोष वसंत मगदूम (६०) असे असून ते अंगाने स्थूल, रंग सावळा, उंची ५ फूट १ इंच, डोक्याचे व दाढीचे केस पांढरे झालेले आहेत. या वृद्धाच्या छातीत दुखू लागल्याने त्यांना उपजिल्हा रुग्णालयात उपचारार्थ दाखल केले असता, तेथे त्यांचा मृत्यू झाला. याबाबतची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. या संदर्भात कोणाला माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाण्यात संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# नवीन पनवेल पोलीस चौकीची दुरवस्था

■ चौकीच्या बाहेर खूर्ची टाकून बसण्याची वेळ



**पनवेल : वार्ताहर**

नवीन पनवेल येथील शिवा कॉम्प्लेक्सजवळील पोलीस चौकीची दुरवस्था झाली आहे. चौकीतील भिंतीना तडे गेले असून चौकीत सर्व वस्तू अस्ताव्यस्तपणे पसरल्या आहेत. जनतेच्या सुरक्षेसाठी दिवस-रात्र काम करणाऱ्या पोलिसांनाच बसायला जागा नाही. त्यामुळे चौकीच्या बाहेर खूर्ची टाकून बसण्याची वेळ त्यांच्यावर आली आहे.

खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या अंतर्गत असलेल्या नवीन पनवेल येथील शिवा कॉम्प्लेक्सच्या पोलीस चौकीची अतिशय दुरवस्था झालेली असून ठिकठिकाणी भिंतींना तडे गेले आहेत. या पोलीस चौकीचा उद्घाटन समारंभ २ ऑक्टोबर २००६ रोजी नवी मुंबई परिमंडळ दोनचे तत्कालीन पोलीस उपायक्त प्रवीण पवार यांच्या हस्ते झाले होते. मात्र सद्यस्थितीत या पोलीस चौकीची अवस्था दयनीय झाली आहे. चिपळे, विहिघर, आकुर्ली, सुकापूर आदी गावे या पोलीस चौकीच्या कार्यक्षेत्रात येतात, मात्र चौकीची अवस्था पाहून पुन्हा या चौकीत येत नसल्याचे अनेक नागरिक सांगतात.

चौकीतील खिडकी, काचा फुटलेल्या आहेत. तर कागदपत्रेही जळाली आहेत. येथील पत्रेदेखील फुटुन खाली पडले आहेत. सर्व सामान अस्तव्यासत्व पडलेले दिसून येते. त्यामुळे येथे पोलिसांनाच बसायला जागा नाही. यापूर्वी येथे याठिकाणी एक उपनिरीक्षक आणि तीन-चार पोलीस कर्मचारी काम करीत असत. पावसाळा काही महिन्यांवर आला आहे, त्यामुळे एखादी दुर्घटना घडण्याआधी या चौकीची डागडुजी करण्यात यावी, अशी मागणी केली जात आहे.

**दुरवस्थेमुळे कोणीही फिरकत नाही**

*चौकीची झालेली दुरवस्था पाहून येथे कोणीही फिरकत नाहीत. तक्रार करणारे नागरिक किंवा चौकशीसाठी आलेल्या नागरिकांना रिक्षाभाडे देऊन थेट खांदा कॉलनीतील पोलीस स्टेशन गाठावे लागते, अशी तक्रारही नागरिकांकडून करण्यात येत आहे.*

### महिलेचे सोन्याचे मंगळसूत्र लुबाडले

**पनवेल : वार्ताहर**

फुल विक्री करणाऱ्या एका महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र हातचलाखीने लुबाडून पसार झाल्याची घटना पनवेल शहरात घडली आहे.

सुप्रिया बहाडकर (६०) या जवेरी बाजारमधील हनुमान मंदिर परिसरात फुले व तेलविक्रीचा व्यवसाय करतात. मंदिरात आलेल्या एका भामट्याने त्यांना एका नोटेवर मंगळसूत्र काढून ठेवण्यास सांगितले. मंगळसूत्र काढून ठेवल्यावर त्याने नोटांमध्ये मंगळसूत्र गुंडाळले. त्यानंतर बहाडकर यांना बोलण्यात गुंतवून त्याने मंगळसूत्र असलेल्या नोटांची गुंडाळी पिशवीत ठेवण्याचा बहाणा करून हातचलाखीने मंगळसूत्र काढून घेतले आणि पसार झाला. काही वेळानंतर त्यांना आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात केली आहे.

## आपट्यातील तळे बनले कचराकुंडी

### गावात घंटागाडी, पण कचरा तळ्याकिनारी



**रसायनी : प्रतिनिधी**

रसायनी परिसरातील आपटा गावात पूर्वी सरदार बिवलकर यांनी ग्रामस्थांसाठी तळे निर्माण करून पाण्याची व्यवस्था केली होती. मात्र सद्य स्थितीत य तळ्याला कचराकुंडीचे स्वरूप आले आहे. गावात ग्रामपंचायतीची घंटागाडी फिरत असूनही अनेक जण कचरा तळ्याच्या किनारी टाकत असल्याने या परिसरात दुर्गंधी पसरली आहे.

आपटा गावात फार पूर्वी ग्रामस्थांना पाण्याची सोय व्हावी, यासाठी तळे निर्माण करण्यात आले होते. पूर्वीच्या काळी या तळ्यातील पाण्याचा वापर महिला वर्ग भांडी व कपडे धुण्यासाठी करीत असत. तसेच याच तळ्याच्या पाण्यात गणपती विसर्जनही करण्यात येत होते. मात्र सद्य स्थितीत या तळ्याच्या सभोवताली मोठ्या प्रमाणात कचऱ्याचे साम्राज्य पसरले आहे.

एकीकडे शासन स्वच्छता अभियान राबवत आहे. तर दुसरीकडे पाण्याचे स्त्रोत नागरिकांकडून अशा प्रकारे खराब करण्यात येत आहेत. गावात ग्रामपंचायतीची घंटागाडी दररोज गावातील कचरा जमा करण्यासाठी फिरत असते. मात्र तरीदेखील अनेक जण तळ्याच्या किनाऱ्यावरी मोठ्या प्रमाणात कचरा टाकत आहेत. या कचऱ्यामुळे परिसरातही दुर्गंधीचे वातावरण पसरले असून ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात आले आहे. त्यामुळे ग्रामपंचायतीने याबाबत त्वरीत ठोस उपाययोजना करून तळ्याच्या परिसरात कचरा टाकणाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरीत आहे.

## गव्हाण विद्यालयात १२ ते १४ वयोगटातील विद्यार्थ्यांचे लसीकरण

**गव्हाण : वार्ताहर**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये १२ ते १४ वयोगटातील विद्यार्थ्यांचे कोविड प्रतिबंधक लसीकरण शुक्रवारी (दि. २५) सुरू झाले. विद्यार्थी व पालकांचा या लसीकरण मोहिमेस भरघोस प्रतिसाद मिळत आहे.

येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या माध्यमातून वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. अब्दुल करीम यांच्या नेतृत्वाखाली आरोग्यसेविका ए. आर. तोंडलेकर व सी. एच. धुर्वे, आरोग्य सेवक एम. एल. जगताप व जे. एस. कदम यांच्या पथकाकडून लसीकरण सुरू झाले. विद्यालय पाचवी ते बारावीचे वर्ग पूर्ण क्षमतेने सुरू झाले असल्यामुळे तसेच शासनाच्या सूचनेनुसार १२ ते १४ या वयोगटातील विद्यार्थ्यांचेही लसीकरण पूर्ण होण्यासाठी विद्यालयाच्या प्राचार्या साधना डोईफोडे प्रयत्नशील आहेत.



या वेळी रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व समन्वय समिती सदस्य रवींद्र भोईर तसेच उपमुख्याध्यापक जगन्नाथराव जाधव, पर्यवेक्षक दीपक भर्णुके व क्रीडाशिक्षक जयराम ठाकूर आणि इतर वर्गशिक्षक उपस्थित होते.

लहान गटातील विद्यार्थ्यांचे कोविड प्रतिबंधक लसीकरण करण्यासाठी विद्यालयामध्ये विद्यार्थ्यांसोबत पालकांची हजेरी लक्षणीय होती.

## पनवेलमध्ये कोविड योद्ध्यांना प्रशस्तीपत्रक

**पनवेल : प्रतिनिधी**

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने कोरोना काळात काम केलेल्या डॉक्टर्स, एएनएम, जीएनएम, वॉर्डबॉय, डाटा एन्ट्री ऑपरेटर या कोविड योद्ध्यांना मुख्य वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांच्या हस्ते प्रशस्तीपत्रकाचे वाटप गुरुवारी (दि. २४) आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह येथे करण्यात आले.



दोन वर्षांपासून कोविड काळात आपल्या जीवाची पर्वा न करता आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचारी अविरत काम करीत आहेत. त्यांच्या या कामाबद्दल शासनाच्या वतीने प्रशस्तीपत्रक देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

यासोतबच १२-१४ वयोगटातील मुलांचे कोविड लसीकरण लवकरात लवकर करण्यासाठी आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली ११६ शाळांची ऑनलाइन बैठक घेण्यात आली. सध्या या लसीकरणाचे नियोजनपूर्वक वेळापत्रक आले आहे. उपजिल्हा रुग्णालयाबरोबर, के. व्ही कन्याप्रशाला येथे नुकतेच १२-१४ वयोगटातील विद्यार्थ्यांच्या लसीकरणास सुरुवात झाली असून आत्तापर्यंत ७२४ मुलींचे लसीकरण करण्यात आले आहे.

## नेरुळ रेल्वेस्टेशन परिसराने घेतला मोकळा श्वास

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील नेरुळ हे महत्त्वाचे उपनगर असून नेरुळ रेल्वेस्थानक परिसरात फेरीवाल्यांनी आपले बस्तान बसवल्याने नागरिकांना अडचण येत होती. तसेच वाहतुकीलाही अडथळा निर्माण होत आहे. त्यामुळे महापालिकेकडून त्यांच्यावर कारवाई करण्यात येत आहे.

गेल्या चार दिवसांपासून महापालिकेने पोलीस बंदोबस्तासह या फेरीवाल्यांना हटविल्याने स्थानक परिसराने मोकळा श्वास घेतला आहे. रेल्वेस्थानक पूर्व व पश्चिम, नेरुळ पूर्वेला अभ्युदय बँकेसमोरील पदपथ, उड्डाणपूल, नेरुळ बस डेपो, शिरवणे मार्केट परिसर, जुईनगरमधील चिंचोली तलावाकडून रेल्वेस्थानक रस्ता, नेरुळ सेक्टर १०, नेरुळ सेक्टर १६ आदी ठिकाणी फेरीवाले मोठ्या संख्येने आहेत. चार दिवसांपासून ही कारवाई सुरू असल्याने रेल्वेस्थानक परिसर फेरीवाल्यांपासून मुक्त झाला आहे. नागरिकांनी या कारवाईचे स्वागत केले असून कारवाईत सातत्य ठेवण्याची मागणी केली आहे.

**महापालिकेकडून फेरीवाल्यांवर कारवाई**

## मालमत्ता कर थकबाकीदारांकडून अत्यल्प प्रतिसाद

### नवी मुंबई महापालिका आक्रमक; कारवाईचा इशारा

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता कर थकबाकीदारांना १५ ते ३१ मार्चपर्यंत विशेष अभय योजना जाहीर करण्यात आली आहे, मात्र अद्यापही या मालमत्ताकर थकबाकीदारांकडून महापालिकेच्या आवाहनाला अत्यल्प प्रतिसाद मिळत असून महापालिका प्रशासनाने या थकबकोदारांविरोधात कारवाईचा इशारा दिला आहे.

अभय योजनेतंर्गत थकबाकीदारांनी आपल्या मालमत्ता कराची संपूर्ण थकीत रक्कम अधिक दंडात्मक रक्कमेतील २५ टक्के रक्कम भरल्यास त्यांना ७५ टक्के इतक्या मोठ्या प्रमाणात सवलतीचा लाभ मिळत आहे, मात्र काही मोठ्या मालमत्ताकर थकबाकीदारांकडून या सवलतीचा लाभ घेण्यासही फारशी उत्सुकता दिसून येत नाही. त्यामुळे या थकबाकीदारांवर धडक कारवाई सुरू करण्यात आलेली आहे.

**नळजोडणी करणार खंडित**

*सुमारे २९९ मालमत्ताधारकांवर अंतिम मुदतीच्या दोन दिवसांत करभरणा करण्याच्या नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. या कालावधीत थकीत मालमत्ताकराचा भरणा न केल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामधील प्रकरण ८, क्र. ४२ ते ४८ अन्वये मालमत्ता जप्तीची, बँक खाती गोठविण्याची तसेच नळ जोडणी खंडित करण्याची कारवाई करण्यात येणार आहे, असेही महापालिका प्रशासनाने सांगितले आहे.*

त्यामुळे मालमत्ता कर थकबाकीदारांनी त्वरित थकीत मालमत्ता कर भरणा करावा, असे आवाहन महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांच्या वतीने करण्यात येत आहे.

## हिरव्या मिरचीने सामान्यांना ठसका

### दराने गाठला उच्चांक; प्रतिकिलो १४० रुपयांवर



**कळंबोली : प्रतिनिधी**

उन्हाळ्यात उष्ण वातावरणाने भाज्यांचे भाव वधारण्यास सुरुवात होत असते. एपीएमसी बाजारात हिरवी मिरचीची आवक मागणीच्या तुलनेत तुरळक २० ते ३० टक्के होत असल्याने हिरवी मिरची घाऊकमध्ये १४० रुपयांवर पोहचली आहे, तर किरकोळ बाजारात १५० पार केली आहे. इतिहास पहिल्यांदाच बाजारात मिरचीच्या दरांनी गाठला उच्चांक गाठला असून दुप्पट दरवाढ झाली आहे. त्यामुळे सध्या नित्याने लागणारी मिरची सर्वसामान्यांना मात्र चांगलीच झोंबत आहे.


एपीएमसी बाजारात फेब्रुवारीमध्ये दर आटोक्यात होते, मात्र उन्हाचा तडाखा सुरू होताच मिरच्या दराने उच्चांक गाठला आहे. एपीएमसी बाजारात मार्च मध्ये आवक कमी झाली आहे. नित्याने ४० ते ५० गाड्या दाखल होतात. मात्र आता पुन्हा ५-६ गाड्या त्यांनंतर आता आणखीन कमी होऊन २-४ गाड्या दाखल होत आहेत. सध्या एपीएमसी बाजारात गुजरात आणि पालघर येथून दाखल होत आहेत. यंदा हिरवी मिरची लागवड कमी करण्यात आली. तसेच अवकाळी पावसानेही उत्पादनाला फटका बसला आहे. त्यामुळे यंदा बाजारात आता अवघी २० ते ३० टक्के हिरवी मिरची दाखल होत आहे. एपीएमसी घाऊक बाजारात या आधी हिरवी मिरची जास्तीत जास्त ७० ते ८० रुपयांवर गेली होती, मात्र यावर्षी पहिल्यांदाच दुप्पटीने दरवाढ झाली आहे. घाऊक बाजारात प्रतिकिलो १४०रुपयांवर तर किरकोळ बाजारात दीडशे पार केली आहे.

**एपीएमसी बाजारात सध्या हिरव्या मिरचीची आवक कमी होत आहे. त्यामुळे दराने पहिल्यांदाच उच्चांक गाठला आहे.**

**-नाना बोरकर, घाऊक व्यापारी**

## उरण तालुक्यात विजेच्या खेळखंडोब्याने नागरिक त्रस्त

महावितरण





**उरण : प्रतिनिधी**

महावितरणच्या दुर्लक्षामुळे उरणच्या पूर्व विभागात विजेचा सातत्याने खेळखंडोबा सुरू असून याचा त्रास विद्यार्थी आणि सर्वसामान्य जनतेला बसत आहे.

तालुक्यातील पूर्व भाग विकसित होत आहे. त्यामुळे विजेच्या वापरातही वाढ झाली आहे, मात्र कोणत्या ना कोणत्या भागामध्ये फॉल्ट असल्याचे कारण पुढे करीत वारंवार वीजपुरवठा खंडित करण्यात येत आहे. उत्तम प्रतीची केबल न वापरल्याने खोपटा पुलावर तर अनेक वेळा केबल जळल्याचे प्रकार होत असल्याचे येथील नागरिकांचे म्हणणे आहे. सध्या दहावी, बारावीच्या विद्यार्थ्यांची परीक्षा सुरू आहे. त्यांच्याही अभ्यासात व्यत्यय येत आहे. त्याचप्रमाणे छोट्या-मोठ्या व्यावसायिकांचेही विजेअभावी मोठे नुकसान होत आहे. वारंवार तक्रारी करूनदेखील महावितरण याकडे दुर्लक्ष करीत असल्याने नागरिकांमधून संताप व्यक्त होत आहे.

*गेले २० दिवस सतत वीज गायब होते. मुलांच्या परीक्षा सुरू आहेत. तापमानात वाढ होऊन उकाडाही वाढला आहे. वीज तासन्‌तास गायब असते. मात्र बिल जैसे थे येते. त्यामध्ये कधीच कमी होत नाही.*

*-अनंत ठाकूर, ज्येष्ठ नागरिक, खोपटे*

*एक-दोन ठिकाणी फिडर बंद पडला होता. केबल जळाली होती. कोठे ना कोठे छोटे-मोठे फॉल्ट निघत आहेत. लवकरच वीजपुरवठा सुरळीत होईल.*

*-व्ही. आर. सोनावले, उपकार्यकारी अभियंता, उरण*

## उरण महाविद्यालयात वार्षिक क्रीडा सप्ताह उत्साहात

**उरण : रामप्रहर वृत्त**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील क्रीडा विभागाच्या वतीने वार्षिक क्रीडा सप्ताह उत्साहात पार पडला. कोटगाव ग्रामसुधारणा मंडळाच्या मैदानात पार पडलेल्या या क्रीडा सप्ताहाचे उद्घाटन मुंबई विद्यापीठातील शारिरिक शिक्षण व क्रीडा विभागाचे संचालक डॉ. मोहन अमरूले यांच्या हस्ते झाले.

त्यांनी खेळाच्या माध्यामातून विद्यार्थ्यांनी करियर करावे, असे सांगितले. या वेळी शिवछत्रपती पुरस्कार विजेते सूर्यकांत ठाकूर उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. बळीराम ए. गायकवाड यांनी खेळाचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगितले व अधिकाधिक क्रीडा प्रकारात विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवावा, असे प्रतिपादन केले.

या वेळी प्रा. के. ए. शामा व प्रा. व्हि. एस. इंदूलकर, क्रीडा विभागप्रमुख प्रा. एच. के. जगताप, प्रा. आर. टी. ठवरे, प्रा. मयुरी मढवी, प्रा. डॉ. दत्ता हिंगमिरे उपस्थित होते. क्रिकेट, रनिंग, लांब उडी, उंच उडी, गोळाफेक, थाळीफेक, भालाफेक, कॅरम, बुद्धीबळ, बॅटमिंटन आदी स्पर्धांना विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद मिळाला.



## संपादकीय

# बेफिकिरी नकोच

**केंद्र सरकारने कोरोना महामारीसंबंधीचे निर्बंध मागे घेत असल्याचे म्हटले हा सोयीचा भाग तेवढा लोकांनी उचलून धरला आहे. खबरदारी कायम ठेवण्याबाबत केंद्राने केलेली सूचना मात्र बहुतेकांनी दुर्लक्षित केली आहे. ही अशी बेफिकिरी आपल्याला परवडणार आहे का? जगभरातील अनेक देशांमध्ये ओमायक्रॉन आणि बीए २ हे दोन विषाणू धुमाकूळ घालत आहेत या वास्तवाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.**

देशात कोरोनाची महासाथ सुरू होऊन अवघे जगणे ठप्प होण्याला नुकतीच दोन वर्षे पूर्ण झाली, पण अलिकडच्या काळात देशभरात आणि राज्यातही कोरोना रुग्णांची संख्या कमालीची खाली आल्याने साथीसंबंधीचे निर्बंध पूर्णत: उठवण्याची चर्चा सुरू झाली. पाठोपाठच साथरोग नियंत्रण कायद्यानुसार दोन वर्षांपूर्वी घातलेले सारे निर्बंध ३१ मार्चपासून मागे घेण्याची घोषणा केंद्र सरकारने केली. ही घोषणा करतानाच मास्क लावणे आणि सामाजिक अंतर राखणे ही खबरदारी मात्र घ्यावीच लागेल हेही केंद्र सरकारने स्पष्ट केले, परंतु सर्वसामान्य जनतेची मानसिकता तर महामारी संपली अशीच झाली आहे. धुळवडीच्या दिवशी अनेकांनी मास्कला सुटी दिली आणि तेव्हापासून शक्य असेल तिथे मंडळी मास्कविना वावरण्याची सवलत बिनदिक्कत घेऊ लागली आहेत. सामाजिक अंतर राखणे असे काही आपण अगदी अलीकडेपर्यंत पाळत होतो याचाही एव्हाना कित्येकांना पुरता विसर पडला आहे. जिथे खुर्च्यांवर स्टिकर चिकटवून बसण्यास मनाई केली जाते, तिथे तेवढे आता सामाजिक अंतर राखले जाताना दिसते. बाकी सर्वदूर जगणे पूर्ववत झाले आहे. लोकांनी हे असे वागणे स्वाभाविकही आहे. कोरोनापूर्व जगणे अनुभवण्याची ओढ सर्वांनाच वाटते आहे. देशाच्या आर्थिक व्यवस्थेचा गाडा सुरळीत व्हावयाचा असेल, तर जगणे पूर्ववत होण्याला पर्यायही नाही आणि देशाची पावले त्या दिशेनेच पडत आहेत, पण ते करत असतानाच चीन, अमेरिका आणि अन्य काही दक्षिण आशियाई देशांमधील वाढती कोरोना रुग्णसंख्या दुर्लक्षित करून चालणार नाही. या देशांमध्ये कोविड केसेसनी शिखर गाठलेले असताना आपल्याकडे साथ ओसरलेली पाहायला मिळते आणि या देशांमध्ये रुग्णसंख्या घसरू लागल्यावर आपल्याकडे साथ फैलावताना दिसते हे आपण गेल्या दोन वर्षांच्या काळात अनुभवलेले आहे. येत्या जून महिन्यात कदाचित भारताला कोरोना महामारीच्या चौथ्या लाटेचा फटका बसेल असा अंदाज आयआयटी कानपूरने एका अभ्यासाअंती व्यक्त केला आहे. तूर्तास आपल्याकडील कोरोना रुग्णसंख्या लक्षणीयरित्या खाली गेली असली तरी बीए २ हा या विषाणूचा नवा अवतार हळूहळू भारतात पाय पसरतो आहे हेही तपासण्यांतून समोर आले आहे. देशात लसीकरण बऱ्यापैकी झालेले असल्याने एखादा नवा विषाणू आल्याशिवाय आपल्याकडे मोठी रुग्णवाढ पाहायला मिळणार नाही, असे मतही काही तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे. यापूर्वीच्या तीन लाटांमध्ये आपल्या आरोग्यव्यवस्थेच्या क्षमतेत चांगली सुधारणा झाली हीदेखील एक जमेची बाजू आहेच. त्यामुळेच केंद्र सरकारने निर्बंध हटवण्याचे पाऊल उचलले आहे, परंतु सोबतच सरकारने घातलेली खबरदारी कायम राखण्याचे आवाहन दुर्लक्षित करता येणार नाही. अद्याप लहान मुलांचे लसीकरण झालेले नाही. बूस्टर डोसही अनेकांना मिळायचा आहे. अशात बेफिकिरीमुळे चौथ्या लाटेला तोंड द्यावे लागले, तर बसणारा आर्थिक फटका आपल्याला अजिबातच परवडणार नाही हे लक्षात ठेवायला हवे.

# नवोपक्रमामुळे विद्यार्थ्यांना लागली शाळेची गोडी

**कोरोना काळात विद्यार्थ्यांना शाळेची गोडी लागावी, त्यांची उपस्थित वाढावी व अध्ययन आणि अध्यापन हसतखेळत व्हावे यासाठी बनोटी गावातील राजिप शाळेने २०२१-२२ या शैक्षणिक वर्षात विविध अभिनव उपक्रम राबविले. यामुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळाली असून ते या नवोपक्रमात गुंतून गेले आहेत. शाळेच्या नवोपक्रमशील शिक्षिका तृप्ती रवींद्र सावंत यांनी शाळेमध्ये हा आमूलाग्र बदल घडून गुणात्मक विकास करून दाखविला आहे. ही शाळा इयत्ता पहिली ते चौथीची आहे. इतक्या लहान वयोगटातील हे चिमुरडे विविध उपक्रमात हिरहिरीने सहभागी होत असून त्यांना शाळेची गोडी लागली आहेत.**

**खबरबात**
**धम्मशील सावंत**



### वाचन अभियान उपक्रम

बढे भारत अभियाना अंतर्गत शंभर दिवस वाचन अभियान उपक्रम शाळेमध्ये यशस्वीपणे राबविला जात आहे. यामध्ये विद्यार्थ्यांना त्यांच्या गटानुसार एक ते दोन व तीन ते चार याप्रमाणे ग्रंथालयातून पुस्तक वाचण्यासाठी प्रोत्साहित केले जाते. विद्यार्थी आपल्या आवडीने ग्रंथालयातील पुस्तक निवडतात व सांगितलेल्या कथा, कविता व संवाद वाचतात. यातून विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण झाली आहे.



### भाषा संगम

'एक भारत श्रेष्ठ भारत' या अभियानांतर्गत भाषा संगम हा उपक्रमदेखील शाळेत राबविला जातो. यामध्ये विद्यार्थ्यांना दुसऱ्या एका राज्याची भाषा शिकवली जाते. विद्यार्थ्यांना कोकणी भाषा शिकवली. विद्यार्थी कोकणी भाषेतील दैनंदिन जीवनातील वाक्य बोलतात. विद्यार्थी शालेय वयापासूनच दुसऱ्या राज्याची भाषा शिकल्यामुळे त्यांच्यात एक आत्मविश्वास निर्माण झाला आहे.



### गोष्टींचा शनिवार

शाळेत दर शनिवारी विद्यार्थ्यांना त्यांच्या वयोगटानुसार चित्रांसहित गोष्टी ऐकवल्या व वाचून दाखविल्या जातात. विद्यार्थी त्या कथा श्रवण करतात व आपल्या भाषेमध्ये पुन्हा कथन करतात तसेच गोष्टींवर आधारित कृतिपत्रिकादेखील सोडवून घेतली जाते. यामुळे विद्यार्थी आनंददायी पद्धतीने नवीन गोष्टी शिकतात, स्वतः सांगतात. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या श्रवण, भाषण कौशल्यात वाढ झाली आहे. विद्यार्थ्यांचा भाषिक विकास चांगल्या प्रकारे झाला आहे. विद्यार्थ्यांना गोष्टीतून चांगला बोध मिळतो. तो बोध नकळतपणे त्यांच्या जीवनात रूजलेला पाहायला मिळत आहे.

### शालेय परसबाग

शाळेच्या परिसरात विविध प्रकारची फळझाडे व भाज्यांची लागवड करण्यात आली आहे. भाज्या लागवड करतांना कशाप्रकारे त्यांची लागवड करावी, रोपे कशी लावावी, रोपाची काळजी कशी घ्यावी, रोपांची वाढ कशी होते या गोष्टींचा प्रत्यक्ष अनुभव विद्यार्थ्यांना नियमित दिला जातो. यामुळे विद्यार्थ्यांना स्वानुभव मिळतो. तसेच यातून परिसर अभ्यासातील घटकाचा अभ्यास विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कृतीतून घेता येत आहे. वनस्पतींचे अवयव कोणते, वनस्पतींची वाढ कशी होते, वाढीसाठी आवश्यक घटक कोणते, याबद्दल विद्यार्थी माहिती सांगू लागले आहेत. तसेच 'झाडे लावा झाडे जगवा' हा संदेश आपोआपच विद्यार्थ्यांमध्ये रुजला आहे.



### योगाभ्यास

विद्यार्थ्यांचे अवधान केंद्रित करून अभ्यासातील गती वाढवणे, विद्यार्थ्यांना सदृढ बनविणे, रोगप्रतिकार शक्ती वाढवणे व शरीर लवचिक बनविणे यासाठी प्रत्येक शनिवारी शाळेत विद्यार्थ्यांना विविध योगासने शिकवली जातात. विद्यार्थी उत्तम प्रकारे योगासने करतात व दररोज त्याचा घरी सरावसुद्धा करतात. त्यामुळे विद्यार्थ्यांची रोगप्रतिकारशक्ती तर वाढली आहेच. त्याचबरोबर ध्यानधारणेमुळे लक्ष केंद्रित करणे सोपे झाले आहे. विद्यार्थ्यांची अध्ययनातील गती वाढण्यास त्याचा खूप उपयोग झाला आहे.

### इंग्रजी कॅरम उपक्रम

इंग्रजी भाषा विद्यार्थ्यांना सुलभपणे बोलता यावी, विद्यार्थ्यांमध्ये इंग्रजी शब्द संपत्तीची वाढ व्हावी, विद्यार्थ्यांनी हसत खेळत इंग्रजी शिकावे, यासाठी तृप्ती सावंत यांनी इंग्रजी कॅरमची निर्मिती केली. विद्यार्थी इंग्रजी कॅरमचा वापर करून हसत खेळत इंग्रजी शब्द संपत्तीत वाढ करू लागले आहेत. यामध्ये विद्यार्थ्यांना प्रत्येक इंग्रजी अल्फाबेटवरून शब्द सांगता येऊ लागले. विविध गावे, जागा, प्राणी, पक्षी यांची नावे सांगतात. शब्दसंपत्ती वाढल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला आहे. त्याचबरोबर इंग्रजी भाषेची आवड निर्माण झाली. त्यांची इंग्रजी भाषेची भीती दूर झाली.



(छाया : संतोष पेरणे)

# कर्जत शहरात सायकल रॅली

**कर्जत : बातमीदार**

माझी वसुंधरा अभियानानिमित्त कर्जत नगर परिषदेच्या वतीने शहरात पर्यावरण रॅली काढण्यात आली होती. कर्जत शहरातील अनेक सायकलपटूंनी या रॅलीत सहभागी होऊन नागरिकांना पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला.

कर्जत शहरातील नागरिकांनी पर्यावरण संवर्धनासाठी पुढे यावे, यासाठी नगर परिषदेने सायकल रॅलीचे आयोजन केले होते. शहरातील छत्रपती शिवाजी महाराज स्मारक येथे नगराध्यक्षा सुवर्णा जोशी आणि मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील यांनी या सायकल रॅलीला हिरवा झेंडा दाखवला. या रॅलीत सहभागी झालेल्या सर्व सायकलपटूंना नगर परिषदेकडून पर्यावरण जागृतीचे संदेश देणारे टी-शर्ट देण्यात आले होते. ही रॅली कचेरी रोडने मुद्रे नाना मास्तर नगर, गुरूनगर, स्वप्ननगरी, आमराई, दहिवली, आकुरले मार्गे पुन्हा कर्जत शहरात आली.

> **पर्यावरण राखण्यासाठी नगर परिषदेने वृक्ष लागवडीवर भर दिला आहे. शहरात २०२१ मध्ये पाच हजार झाडे लावली असून यावर्षी २५ हजार झाडे लावण्याचे उद्दिष्ट आहे.**
> **-डॉ. पंकज पाटील, मुख्याधिकारी, नगर परिषद, कर्जत**

शहरातील बाजारपेठ, महावीरपेठ, स्टेशन रोड, डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक मार्गे नगर परिषद कार्यालय येथे आली. तेथे रॅलीचा समारोप करण्यात आला. या रॅलीदरम्यान विद्यार्थ्यांनी पर्यावरण जागृती विषयक पथसंचलन केले. नगरसेवक विवेक दांडेकर, नगरसेविका मधुरा चंदन, आरोग्य निरीक्षक सुदाम म्हसे यांच्यासह शहरातील लहान थोर सायकलपटू आणि पर्यावरण रक्षणाचे संदेश देणारे फलक घेऊन नगरपालिका कर्मचारी या रॅलीत सहभागी झाले होते.

# पेणमध्ये शाळापूर्व अभियान प्रशिक्षण शिबिर

## पालकांनी केले उपक्रमाचे कौतुक

**पेण : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासन, एनसीईआरटी पुणे, प्रथम संस्था व पंचायत समिती यांच्या संयुक्त विद्यमाने पेण उर्दू शाळा क्र. ५ मध्ये विद्यार्थ्यांसाठी दोन दिवशीय शाळापूर्व प्रशिक्षण शिबिर घेण्यात आले. गटशिक्षणाधिकारी अरुणादेवी मोरे यांनी प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले.

कोविड काळामध्ये बालवाड्या बंद होत्या. त्यामुळे झालेले शैक्षणिक नुकसान (लर्निंग लॉस) भरून काढण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक, बौद्धिक, सामाजिक व भावनिक क्षमता तसेच भाषा विकास क्षमता अवगत होण्यासाठी राबविण्यात आलेल्या या शाळापूर्व प्रशिक्षण शिबिरात एकूण १८ केंद्रातील प्रत्येकी दोन असे तब्बल ३६ प्रशिक्षणार्थींनी सहभाग घेतला होता. विनोद म्हात्रे व अतीता पाटील यांनी सुलभक म्हणून तर निलेश मानकवळे व करुणा म्हात्रे यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले.



(छाया : अनिस मनियार)

शिबिराच्या दुसऱ्या दिवशी बाळमेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. त्यात पेण तालुक्यातील दाखलपात्र २० विद्यार्थी सहभागी झाले होते. या विद्यार्थ्यांनी दोरी उड्या मारणे, चित्रात रंग भरणे, आपल्या परिवारातील सदस्यांची ओळख देणे, बादलीत चेंडू टाकणे, वस्तू मोजणे अक्षरांचे वाचन करणे, क्रम लावणे अशा विविध क्रिया केल्या. या तालुका प्रशिक्षणानंतर केंद्रस्तरीय प्रशिक्षण व त्यानंतर शाळास्तरावर मेळाव्याचे आयोजन करण्यात येणार आहे.

त्यांनतर १२ आठवड्यामध्ये माता पालक समूहातून दाखलपात्र विद्यार्थ्यांकडून विविध उपक्रम कृती करून घेऊन त्यांच्यामध्ये अपेक्षित सर्व क्षमता विकसित केल्या जाणार आहेत. याची पुन:पडताळणी म्हणून शाळा स्तरावर दुसरा मेळावा घेण्यात येईल, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

विद्यार्थ्यांना सक्षम बनवण्याच्या या उपक्रमाचे पालकांकडून कौतुक होत असून उपस्थित पालकांनी शिक्षकांचे आभार मानले.

## आरोग्य प्रहर

# जेवणातील फोडणीचे आरोग्यदायी फायदे

अनेकदा वेगवेगळ्या पदार्थांना वेगवेगळ्या मसाल्यांची फोडणी दिली जाते. यामागेही वेगवेगळी कारणे आहेत. फोडणी दिलेली, म्हणजेच डाळ प्रत्येकालाच आवडते. डाळ, कोशिंबीर, सांबर किंवा कढीसारख्या पदार्थांमध्ये वेगवेगळ्या मसाल्यांचा वापर करून फोडणी दिली जाते, परंतु केवळ जेवणाची चव वाढवण्यासाठी फोडणी दिली जात नाही, तर याचे अनेक फायदे देखील आहेत. फोडणीमध्ये ज्या मसाल्यांचा वापर केला जातो, त्यामध्ये वेगवेगळे गुण असतात, ज्यामुळे आपल्या आरोग्याला फायदा होतो. अनेकदा वेगवेगळ्या पदार्थांना वेगवेगळ्या मसाल्यांची फोडणी दिली जाते. यामागेही वेगवेगळी कारणे आहेत.

- **हिंगाची फोडणी :** तुरीच्या डाळीला देण्यात येणाऱ्या फोडणीमध्ये लसूण आणि आले वापरल्यास पोटाला त्रास होत नाही. तसेच तुम्हाला जेवल्यानंतर पोट फुगण्याची समस्या जाणवत असेल तर डाळीला हिंगाची फोडणी दिल्याने ही समस्या कमी होते. तुरीच्या डाळीला तुपाची फोडणी दिल्यास डाळीचा गुणधर्म थंड होतो.
- **अन्नातील पोषण वाढते :** डाळीमध्ये लसणाचा वापर केल्यास रोगप्रतिकारक शक्ती वाढते. लसणात अँटी-बॅक्टेरियल गुणधर्म असतात, जे संसर्ग, सर्दी, खोकला आणि डोकेदुखी यांसारख्या समस्या दूर करतात.हिंग, जिरे किंवा लसूण घालून फोडणी दिल्यास ते चवीसोबतच अन्नाचे पौष्टिक मूल्यही वाढवते. अनेक विद्रव्य जीवनसत्त्वे शोषून घेण्यासाठी चरबी आवश्यक असते. जेव्हा आपण पदार्थाला तूप किंवा तेलाने फोडणी देतो तेव्हा अन्नातील पोषण वाढते.
- **पचनक्रिया सुधारते :** फोडणीमध्ये विशेषतः मोहरी, जिरे, हिंग, मेथी, जिरे किंवा कढीपत्त्याचा वापर केला जातो. या सर्वांचे वेगवेगळे फायदे आहेत. जिर्याची फोडणी आम्लपित्त आणि अतिसारापासून बचाव करते. तसेच यामुळे पचनसंस्था सुरळीत राहते. जिरे खाल्ल्याने पचनक्रिया सुधारते. त्यामुळे पोट फुगणे, जुलाब, आम्लपित्त आणि अपचन यांसारख्या समस्या उद्भवत नाहीत.
- **कोलेस्ट्रॉलची पातळी नियंत्रणात राहते :** फोडणीमध्ये कढीपत्त्याचा वापर केल्याने कोलेस्ट्रॉलची पातळी नियंत्रणात राहते. यामुळे पचनक्रिया बरोबर राहते आणि मधुमेहाचा धोकाही कमी होतो. कढीपत्त्यात फायबर, कर्बोदके, जीवनसत्त्वे ई, बी, ए, सी, लोह, फॉस्फरस आणि कॅल्शियम भरपूर प्रमाणात असते.
- **स्नायूंमधील वेदना कमी होतात :** डाळीमध्ये मोहरीची फोडणी दिल्याने स्नायूंमधील वेदना कमी होतात आणि कोलेस्ट्रॉलची पातळी नियंत्रणात राहते. डाळीत हिंगची फोडणी दिल्याने डाळीची चवही वाढते.

# पेब किल्ल्यावर स्वच्छता मोहीम

## ▪ शिवक्रांती सामाजिक संस्थेचे श्रमदान

**कर्जत : बातमीदार**

शिवक्रांती सामाजिक संस्थेच्या तृतीय वर्धापन दिनानिमित्त संस्थेच्या कर्जत आणि मुरबाड येथील कार्यकर्त्यांनी विकटगड अर्थात पेब किल्ल्यावर स्वच्छता मोहीम राबविली.

संस्थेचे कर्जत विभाग अध्यक्ष अविनाश भोईर, सचिव अमोल पाटील आणि खजिनदार रसिका डुकरे तसेच मुरबाड विभाग खजिनदार समीर घरत यांनी नेरळ येथील हुतात्मा भाई कोतवाल, हुतात्मा हिराजी गोमाजी पाटील यांच्या अर्धपुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.





त्यानंतर पेब किल्ल्यावर स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत प्लास्टिक आणि बाटल्या तसेच कचरा गोळा करून तो नेरळ येथे आणण्यात आला.

शिवक्रांती सामाजिक संस्थेचे अमोल पाटील, समीर घरत, वैभव तलपे, विक्रम रसाळ, यश बाबरे, कल्पेश फराट, भास्कर डोईफोडे, महेंद्र पाटील, मुकुल दळवी, भरत घरत, नयन दिघे, रोहित मार्के, रोशन दळवी, राजेश भवारे यांच्यासह सर्व सदस्यांनी ही स्वच्छता मोहीम यशस्वी करण्यासाठी श्रमदान केले.

# माणगावात स्टॅम्प पेपरचा तुटवडा

**माणगाव : प्रतिनिधी**

शहरातील स्टॅम्प वेंडर यांच्याकडे गेल्या तीन दिवसांपासून स्टॅम्प पेपर (बॉण्ड पेपर) मिळत नसल्याने सर्वसामान्य नागरिकांची गैरसोय होत आहे. याकडे जिल्हाधिकाऱ्यांनी लक्ष घालून जनतेला होणारा त्रास व त्यांची होणारी पिळवणूक थांबवावी, अशी मागणी माणगाव तालुक्यातील निजामपूरचे माजी सरपंच हमजाभाई जालगावकर यांनी केली आहे.

खरेदी-विक्रीचे व्यवहार करणारे लोक ऑनलाईन पेमेंट करतात. त्यांना बॉण्ड पेपरची गरज लागत नाही, मात्र सर्वसामान्य लोकांना या बॉण्ड पेपरची गरज लागते. तालुक्याच्या ग्रामीण भागातून लोक मिनिडोर अथवा रिक्षाने माणगावात बॉण्ड पेपर घेण्यासाठी येत असतात. त्यांना किमान ६० रुपये रिक्षाभाड्याचा खर्च येतो. गेल्या तीन दिवसांपासून माणगावात १०० रुपयांचा बॉण्ड पेपर मिळत नाही. त्यामुळे सर्वसामान्य लोकांची डोकेदुखी वाढून त्यांची कामे रेंगाळत पडत आहेत. याकडे जिल्हाधिकाऱ्यांनी लक्ष देवून सर्वसामान्य लोकांचे बॉण्ड पेपरसाठी होणारे हाल थांबावेत, अशी मागणी माजी सरपंच जालगावकर यांनी केली आहे.

# रायगडात केवळ पाच अधिकारी वाहताहेत शिक्षण विभागाचा भार

## ५२ मंजूर पदांपैकी तब्बल ४७ पदे रिक्त

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील प्राथमिक व माध्यमिक शिक्षण विभागात राज्य शासनाची ४७ पदे रिक्त आहेत. केवळ पाच अधिकारी जिल्ह्यातील शिक्षण विभागाचा भार वाहत आहेत. प्राथमिक विभाग शिक्षणाधिकारी पद रिक्त आहे. तसेच १५ पैकी १३ गटशिक्षणाधिकारी पदे रिक्त आहेत. अधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्यामुळे शिक्षण विभागाचा कारभार मंदावला आहे.

रायगड जिल्ह्यात महाराष्ट्र शासनाने प्राथमिक विभागासाठी ३५ पदे मंजूर केली आहेत. त्यापैकी केवळ चार पदे भरली आहेत. ३१ पदे रिक्त आहेत. माध्यमिक विभागात २२ पदे मंजूर आहेत. त्यापैकी शिक्षणाधिकारी हे केवळ एक पद भरले आहे. २१ पदे रिक्त आहेत. प्राथमिक आणि माध्यमिक विभागासाठी वेगळे शिक्षणाधिकारी पदे आहेत. माध्यमिक शिक्षणाधिकारी पद भरले आहे. प्राथमिक विभाग शिक्षणाधिकारी पद रिक्त आहे. या पदाचा अतिरिक्त भार सध्या माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांकडे आहे.

प्राथामिक विभागात शिक्षणाधिकाऱ्याचे एक पद मंजूर आहे, ते रिक्त आहे. उपशिक्षणाधिकाऱ्यांची दोन पदे मंजूर आहेत, ती दोन्ही पदे रिक्त आहेत. अधिक्षक गट –ब यासाठी एक पद मंजूर आहे, तेदेखील रिक्त आहे. लेखाधिकारी, शालेय पोषण आहार यासाठी एक पद आहे, ते रिक्त आहे. प्रत्येक तालुक्यात एक असे एकूण १५ गट शिक्षणाधिकाऱ्यांची पदे मंजूर आहेत. त्यापैकी केवळ दोन भरली आहेत, १३ पदे रिक्त आहेत. अधिक्षक, शालेय पोषण आहारच्या १४ पैकी दोन पदे भरली आहेत असून १२ पदे रिक्त आहेत. सांख्येकी एक पद आहे, तेदेखील रिक्त आहे. प्राथमिक विभागात ३५ पैकी केवळ ४ पदे भरली आहेत. ३१ पदे रिक्त आहेत.

माध्यमिक शिक्षण विभागातील शिक्षणाधिकारी पद भरले आहे, मात्र उपशिक्षणाधिकारी वर्ग – २, अधीक्षक गट ब वर्ग – २, सहाय्यक शिक्षण उपनिरीक्षक, जिल्हा विज्ञान पर्यवेक्षक, वरिष्ठ लिपीक, वाहन चालक प्रत्येकी एक पद मंजूर आहे, ही सर्व पदे रिक्त आहेत. प्रत्येक तालुक्यात एक समादेशक अशी १५ पदे मंजूर आहेत, ही सर्व पदे रिक्त आहेत. माध्यमिक शिक्षण विभागात एकूण २२ पदे आहेत. त्यापैकी केवळ शिक्षणाधिकारी हे पद भरले गेले आहे. उर्वरित २१ पदे रिक्त आहेत. प्राथमिक व माध्यमिक विभागात मिळून एकूण ५२ पदे आहेत. त्यापैकी केवळ पाच पदे भरली आहेत. ४७ पदे रिक्त आहेत. रिक्त पदांचा परिणाम शिक्षण विभागाच्या कामकाजावर होत आहे. पदे रिक्त असल्यामुळे शिक्षण विभागाच्या कामाचा वेग मंदावला आहे.

> **राज्य शासनाने पद भरती केलेली नाहीत. जिल्ह्यातील शिक्षण विभागातील रिक्त पदांबाबत राज्य शासनाला कळविण्यात आले आहे. आमचा राज्य सरकारशी पत्रव्यवहार सुरू आहे.**
> **–डॉ. किरण पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जि.प.**

# मोरी रुंदीकरणासाठी तेलवडे ग्रामस्थांचे आज 'रास्ता रोको'

**मुरूड : प्रतिनिधी**

तालुक्यातील दस्तुरी नाका ते तेलवडे गावादरम्यान असलेल्या मोरीच्या रुंदिकरणास तातडीने मंजुरी द्यावी; अन्यथा शनिवारी (दि. २६) दुपारी रस्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा तेलवडे ग्रामस्थांनी दिला आहे.



(छाया : संजय करडे)

मुरूड शहरानजीक असणाऱ्या दस्तुरी नाका ते तेलवडे गाव या दरम्यान मोरी बांधण्यात आली आहे. पावसाच्या पाण्याबरोबर वाहून आलेले छोटेमोठे वृक्ष या मोरीत अडकतात. त्यामुळे पाणी तुंबून ते परिसरातील घरात पाणी शिरते. त्यामुळे पावसाळ्यात येथील ग्रामस्थांना इतर ठिकाणी स्थलांतरीत व्हावे लागते. सदरची अरूंद मोरी तातडीने तोडण्यात येऊन तेथे सिमेंट काँक्रिटचा स्लॅब टाकून मोठी मोरी बांधून मिळावी, ही मागणी मंजूर होण्यासाठी शनिवारी दुपारी ३ वाजल्यापासून तेलवडे येथे रस्ता रोको आंदोलन करणार असल्याचा इशारा ग्रामस्थांनी मुरूड तहसीलदार, पोलीस ठाणे आणि सार्वजनिक बांधकाम खात्याला निवेदनाद्वारे दिला आहे.

> **मोरीच्या रुंदीकरणासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग कोणतीही कार्यवाही करीत नसल्याने ग्रामस्थ आक्रमक झाले आहेत. आम्ही शनिवारी दुपारी रस्ता रोको आंदोलन करणार आहोत.**
> **–कमरुद्दीन हालडे, प्रमुख आंदोलक, तेलवडे, ता. मुरूड**

# कचरामुक्तीसाठी रायगड जि. प. प्रशासन सरसावले

**अलिबाग : प्रतिनिधी**

वाढत्या नागरिकीकरणामुळे डम्पिंग ग्राऊंड व कचऱ्याच्या समस्या दिवसेंदिवस वाढत आहेत. ही समस्या कायमच सोडविण्यासाठी रायगड जिल्हा परिषदेने पुढाकार घेतला आहे. डम्पिंग व कचरा मुक्त गावांसाठी जिल्हा परिषदेच्या माध्यमातून घन कचरा व्यवस्थापनासाठी कंपोस्टींग मशीनचा पुरवठा केला जाणार आहे. त्यासाठी एक कोटी १० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.



रायगड हा ग्रामीण जिल्हा म्हणून ओळखला जात असताना, जिल्ह्याला पर्यटनाच्या दृष्टीने महत्व प्राप्त झाले आहे. जिल्ह्यात ठिकठिकाणी प्रकल्प उभे राहिल्याने औद्योगिकीकरणदेखील वाढत आहे. मुंबईच्या जवळ असलेल्या या जिल्ह्यांतील गावांमध्ये लोकवस्ती वाढू लागली आहे. मात्र बहुतांशी गावांमध्ये डम्पिंग ग्राऊंड नसल्याने अनेक जण मिळेल त्या ठिकाणी कचरा टाकतात. रस्त्याच्या बाजूला, तर काही ठिकाणी शेतांमध्ये कचरा टाकला जातो. त्यामुळे दुर्गंधी निर्माण होऊन आरोग्याचा प्रश्न निर्माण होतो. पावसाळ्यात या कचऱ्यांमुळे पुरपरिस्थिती निर्माण होते.

डम्पिंग ग्राऊंड व कचऱ्याची समस्या कायमच निर्माण झाली आहे. पर्यावरणावर त्याचा मोठा परिणाम होतो. यामुळे वसुंधरेची मोठी हानी होते. मानवी आरोग्याबरोबरच राहणीमानावरही मोठा परिणाम होत आहे. कचऱ्याची ही समस्या कायमची मार्गी लावण्यासाठी रायगड जिल्हा परिषदेने एक पाऊल पुढे टाकून अगळावेगळा उपक्रम गाव पातळीवर सुरु करण्याचा प्रयत्न केला आहे.

रायगड जिल्ह्यात ८१० ग्रामपंचायती आहेत. त्यापैकी पाच हजारपेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या ५५ ग्रामपंचायतींना कंपोस्टींग मशीन पुरवठा करण्याचा जिल्हा परिषदेचा मानस आहे. राजिपचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या संकल्पनेतून ही योजना राबविली जाणार आहे.

ओला व सुका कचरा वेगळा करून मशीनद्वारे कंपोस्टींग केली जाणार आहे. यातून सेंद्रीय खताची निर्मिती करून पर्यावरणाची हानी रोखण्यास मदत होणार आहे. न कुजणाऱ्या प्लास्टीक पिशवी, बाटल्यांवर प्रक्रीया करून टाकाऊपासून टीकाऊ वस्तू तयार करणे अशा अनेक प्रकारचे उपक्रम राबवून गावे, वाड्यांच्या परिसरात असलेला कचऱ्याची योग्य पध्दतीने विल्हेवाट लावण्याचा प्रयत्न असणार आहे. या योजनेच्या माध्यमातून गावांगावात जनजागृती करून कचरा मुक्तीसाठी पुढाकार घेण्याचा प्रयत्न जिल्हा परिषदेने केला आहे. या योजनांमुळे जिल्ह्यातील गावे, कचरा मुक्त होण्यास मदत होणार आहे.

> **माझी वसुंधरा ग्रामीण अभियानंतर्गत रायगड जिल्ह्यात वसुंधरा संवर्धनासाठी जनचळवळ सुरु केली आहे. केंद्र, राज्य सरकार, जिल्हा, तालुका व तसेच सीएसआर अशा वेगवेगळ्या माध्यमातून उपक्रम राबवून डम्पिंग ग्राऊंड व कचरा मुक्तीसाठी पुढाकार घेण्यात आला आहे. त्यासाठी जिल्हा परिषदेने अर्थसंकल्पात तरतूद केली आहे. गावांतील कचऱ्याचा प्रश्न कायमचा मार्गी लावण्याचा प्रयत्न या उपक्रमातून केला जाणार आहे.**
> **–किरण पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद**

# द्रुतगती मार्गावर टेम्पो दरीत कोसळला; चालकाचा मृत्यू

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई–पुणे द्रुतगती मार्गावरील खोपोली हद्दीत शुक्रवारी (दि. २५) सकाळी सिमेंट भरलेला आयशर टेम्पो सुरक्षा कठडा तोडून दरीत कोसळला. या अपघातात टेम्पो चालकाचा जागीच मृत्यू झाला.

सिमेंट गोण्या भरलेला टेम्पो (एमएच–४६,डिएम–७८०६) शुक्रवारी सकाळी बोरघाटातून मुंबईच्या दिशेने जात होता. खोपोलीजवळ ढेकू गावच्या हद्दीत आयशर टेम्पोने (एमएच–०२,एफजी–११८३) या सिमेंटच्या टेम्पोला मागून जोरदार धडक दिली. त्यामुळे सिमेंट गोणी भरलेला टेम्पो सुरक्षा कठडा तोडून खोल दरीत कोसळला. य अपघातात टेम्पोचा चालक उत्तम कैलास दास (वय ३४, रा. पश्चीम बंगाल) जागीच मृत्यू पावला. खोपोली पोलीस पुढील तपास करीत आहेत.



## महाडमध्ये महिलेचा विनयभंग; एकाला अटक

**महाड : प्रतिनिधी**

तालुक्यातील मांडले या गावामधील एका ५५ वर्षीय महिलेचा याच गावातील तरुणाने विनयभंग केल्या प्रकरणी पीडित महिलेने दाखल केलेल्या तक्रारीनुसार सदर तरुणाला अटक करण्यात आली आहे.

महाड तालुका पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार २२ मार्च रोजी रात्री मांडले गावातील ज्ञानेश्वर आळीमधील एका ५५ वर्षीय महिलेच्या घरात घुसून याच गावातील ओमकार विजय दिवेकर (वय २२) याने पीडित महिलेचा विनयभंग करण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणी आरोपी ओमकार याच्यावर महाड तालुका पोलीस ठाण्यात भादवी ४५२, ४५४ अ(खख) गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याला अटक करण्यात आली आहे.


मा. रावसाहेब कोर्ट

ॲड. प्रणाली सोहनी

**जाहीर नोटीस**

**पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात**

दिवाणी चौकशी अर्ज नं. ३७९/२०२२
नि.नं. ८/ड
ने.ता. ६/५/२०२२

१. श्री. महेश नामदेव पाटील
वय – ३९ वर्षे, धंदा – नोकरी
२. श्री. मिलिंद नामदेव पाटील
वय – ३८ वर्षे, धंदा – नोकरी
३. श्री. नामदेव मनोहर पाटील
वय – ७१ वर्षे, धंदा – शेती
सर्व रा. पारगांव, ता. पनवेल, जि. रायगड
} अर्जदार

विरूद्ध

कोणीही नाही } सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार नं. १ व २ यांची आई व अर्जदार नं. ३ यांची पत्नी कै. दमयंती उर्फ द्रौपदी नामदेव पाटील ह्यांचे ता. ३०/८/२०२१ रोजी मौजे पारगांव, ता. पनवेल, जि. रायगड येथे निधन झाले असून त्यांना अर्जदार १ ते ३ असे सर्वजण त्यांचे कायदेशीर वारस आहेत. कै. दमयंती उर्फ द्रौपदी नामदेव पाटील यांचे नांवे असलेल्या जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :–

मिळकतीचे वर्णन
मौजे – नावडे, ता. पनवेल

| अ.क्र. | यु.के.नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|---|
| १ | १६१ | २४६ | २ | ०–३९–४ |
| २ | ४५ | १५८ | ११ | १–०९–० |

येणेप्रमाणे मिळकती असून सदरहू मिळकतीच्या अनुषंगाने सिडकोकडून कै. दमयंती उर्फ द्रौपदी नामदेव पाटील यांस गांवठाण विस्तार योजनेअंतर्गत भूखंड मिळणार आहेत. सदर जमीन मिळकत कै. दमयंती उर्फ द्रौपदी नामदेव पाटील यांचे पश्चात त्यांचे वारसदार म्हणून अर्जदार यांस मिळावेत याकरिता अत्यावश्यक तो वारसदाखला मिळावा म्हणून या न्यायालयात अर्जदाराने अर्ज दाखल केला आहे.

तरी अर्जदार ह्यांच्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत या मे. कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर त्यांच्या वकीलांमार्फत हरकत न घेतल्यास नामदार कोर्ट योग्य त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. आज ता. २५/३/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी सदरची जाहीर नोटीस दिली.

सही/–
व. लिपिक

कोर्टाचा शिक्का

सही/–
सहा. अधीक्षक
दिवाणी न्यायाधिश व. स्तर
पनवेल



**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER EXTENSION NOTICE**

MSETCL invites E-Tender from registered SRM vendors on Mahatransco Website

| Sr. No. | Tender No. | Tender Name | Tender Amount | Submission Date |
|---|---|---|---|---|
| 1 | E-Tender-10/2021-22 RFx No. 7000022567 | Extension of SRM E-Tender for the work of unloading of EHV materials / equipments by crane and labours at Major Stores, Panvel in FY 2022-23. | Rs. 398763/- | 01.04.2022 upto 23:59 Hrs. |

EMD amount Rs.5000/- & Tender fee Rs. 525/- for submission of bids
For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person:** DYEE, Mob. No. 9930057633.
AE, Mob. No. 9833904416

**SD/-**
**EE, MAJOR STORES, PANVEL**



**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**Extension to E –TENDER NOTICE**

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification.**

| S.N. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No.: 7000022670**<br>**Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/e-Tender-16/2022-2023**<br>Extension to RFx E-tender for hiring of vehicle at 100kV Patalganga & Jite substation under EHV (O&M) Division Panvel for period 01.04.2022 to 31.03.2023.<br>**Tender amount Rs. 5,99,992/- EMD amount Rs. 6,000/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **25.03.2022, 12:00 Hrs. to 01.04.2022, 12:00Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 01.04.2022 up to 12:00 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **01.04.2022 at 12:01 hrs. (if Possible)** |

**Tender fees Rs.500/- + GST**
For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

SD/-
**(M.C.JOSHI)**
**EXECUTIVE ENGINEER**
**E.H.V. (O&M) DIVN.PANVEL**



**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**Extension to E –TENDER NOTICE**

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification.**

| S.N. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No.: 7000022665**<br>**Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/e-Tender-11/2022-2023**<br>Extension to RFx E-tender for hiring of vehicle at EHV Substation Maintenance Sub-Division Apta under EHV (O&M) Division Panvel for period 01.04.2022 to 31.03.2023.<br>**Tender amount Rs. 5,99,992/- EMD amount Rs. 6,000/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **25.03.2022, 12:00 Hrs. to 01.04.2022, 12:00Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 01.04.2022 up to 12:00 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **01.04.2022 at 12:01 hrs. (if Possible)** |

**Tender fees Rs.500/- + GST**
For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

SD/-
**(M.C.JOSHI)**
**EXECUTIVE ENGINEER**
**E.H.V. (O&M) DIVN.PANVEL**



**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**Extension to E –TENDER NOTICE**

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification.**

| S.N. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No.: 7000022661**<br>**Tender No.: EE/EHV (O&M)/DN/PNL/e-Tender-7/2022-2023**<br>Extension to RFx E-tender for hiring of vehicle at 220kV Wadkhal substation under EHV (O&M) Division Panvel for period 01.04.2022 to 31.03.2023.<br>**Tender amount Rs. 5,99,992/- EMD amount Rs. 6,000/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **25.03.2022, 12:00 Hrs. to 01.04.2022, 12:00Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 01.04.2022 up to 12:00 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **01.04.2022 at 12:01 hrs. (if Possible)** |

**Tender fees Rs.500/- + GST**
For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

SD/-
**(M.C.JOSHI)**
**EXECUTIVE ENGINEER**
**E.H.V. (O&M) DIVN.PANVEL**



**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**Extension to E –TENDER NOTICE**

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification.**

| S.N. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No.: 7000022647**<br>**Tender No.: EE/EHV (O&M)/DN/PNL/e-Tender-3/2022-2023**<br>Extension to RFx E-tender for hiring of vehicle at 220kV ONGC substation under EHV (O&M) Division Panvel for period 01.04.2022 to 31.03.2023.<br>**Tender amount Rs. 5,99,992/- EMD amount Rs. 6,000/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **25.03.2022, 12:00 Hrs. to 01.04.2022, 12:00Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 01.04.2022 up to 12:00 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **01.04.2022 at 12:01 hrs. (if Possible)** |

**Tender fees Rs.500/- + GST**
For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

SD/-
**(M.C.JOSHI)**
**EXECUTIVE ENGINEER**
**E.H.V. (O&M) DIVN.PANVEL**



**जाहीर नोटीस**

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ खाली दाखल दावा नोटीस**

श्री. सिद्धनाथ नागरी सहकारी पतसंस्था मर्यादीत, दहिवडी, शाखा–कळंबोली या संस्थेने या कार्यालयाकडे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये खालील व्यक्ती विरुद्ध थकीत कर्जाचा भरणा केला नसल्याचे नमूद करून वसुली प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज केलेला आहे.

त्यानुसार या कार्यालयात वेळोवेळी सुनावणी ठेवण्यात आली. तथापि खालील नमूद व्यक्तींना सुनावणी नोटीसची पोहोच होत नसल्याने नैसर्गिक न्याय तत्त्वानुसार म्हणणे दाखल करण्यासाठी जाहीर नोटीस देण्यात येत आहे. या जाहीर नोटीसीद्वारे आपणास पुन्हा एक संधी देण्यात येत असून सदर दाव्याबाबत अंतिम सुनावणी दि. ४.४.२०२२ रोजी सकाळी ११.३० वाजता ठेवण्यात आली असून सदर सुनावणीस आपण स्वत: वा आपले प्रतिनिधीमार्फत उपस्थित रहावे. आपण गैरहजर राहिल्यास आपल्या अनुपस्थितीत दाव्याचा निकाल केला जाईल व नंतर आपले कोणतेही म्हणणे ऐकून घेतले जाणार नाही.

| दावा क्र. | प्रतिवादीचे नाव | पत्ता | थकीत कर्ज |
|---|---|---|---|
| ११६/२१–२२ | अरविंद शंकर कदम (कर्जदार) | हरीनिवास कॉम्प्लेक्स, सेजल अपार्टमेंट, पहिला मजला, रुम नं. १०१, आगसन रोड, बी आर नगर, दिवा ईस्ट, ठाणे ४००६१२ | ४३९२११/– |
| ११७/२१–२२ | दिपक दगडु घुटुगडे (जामिनदार) (प्रकाश महादेव विरकर कर्जदार यांचे जामिनदार) | मु.पो. कामोठे, ता. पनवेल, जि. रायगड. से. ७, बी१–१०४, आदित्य कॉम्प्लेक्स, प्लॉट नं. २, ४१०२०९ | १४७३४८४/– |
| | भिवाजी काशिनाथ दोलताडे (जामिनदार) (प्रकाश महादेव विरकर कर्जदार यांचे जामिनदार) | एलआयजी ए. ३१५–६९, से. ३, कळंबोली ४१०२१८ | १४७३४८४/– |
| ११९/२१–२२ | सचिन शिवाजी मोरे (जामिनदार) (संजय उदयराज सिंग कर्जदार यांचे जामिनदार) | मु.पो. दहिवडी, ता. माण, जि. सातारा ४१५५०८ | २१०४६४३/– |
| | अंकुश बाजीराव बिराजदार (जामिनदार) (संजय उदयराज सिंग कर्जदार यांचे जामिनदार) | मु.पो. दहिवडी, ता. माण, जि. सातारा ४१५५०८ | २१०४६४३/– |
| १२०/२१–२२ | तुकाराम बाबा बिचुकले (कर्जदार) | एलआयजी२ बी/५०ए, से. २, कळंबोली, जि. रायगड ४१०२१८ | ९९७४१७/– |
| | शिवाजी पांडुरंग भोसले (जामिनदार) (तुकाराम बाबा बिचुकले, शंकर बाबा बिचुकले, बाबा दगडु बिचुकले कर्जदार यांचे जामिनदार) | मु.पो. तेटली, ता. जावली, जि. सातारा ४१५०२१ | ९९७४१७/– |

**सदरची नोटीस माझे सही शिक्क्यानिशी दिली आहे.**
स्थळ – पनवेल
दिनांक – २४/०३/२०२२
जा.क्र. – ६५५

सही/–
**(बा. ना. वाघमारे)**
**सहाय्यक निबंधक**
**सहकारी संस्था, पनवेल, जि. रायगड.**


## अखिल भारतीय नागरी सेवा कबड्डी स्पर्धा

# महाराष्ट्राचा संघ जाहीर

### निलेश चिंदरकर, दीपिका जोसेफ यांच्याकडे नेतृत्व

**मुंबई : प्रतिनिधी**

अखिल भारतीय नागरी सेवा कबड्डी स्पर्धेसाठी महाराष्ट्र राज्याने आपले दोन्ही संघ जाहीर केले आहेत. निलेश चिंदरकर यांच्याकडे पुरुष, तर दीपिका जोसेफकडे महिला संघाच्या नेतृत्वाची धुरा सोपविण्यात आली आहे. हरियाणातील सोनिपत येथे २८ ते ३० मार्च या कालावधीत होणाऱ्या या स्पर्धेत या दोन्ही अनुभवी खेळाडूंच्या नेतृत्वाचा कस लागणार आहे.



दीपिकाच्या या संघाला अनुभवी सायली जाधवची साथ लाभली, तरी स्नेहल साळुंखे, सुवर्णा बारटक्के व प्रियांका तावडे यांची उणीव त्यांना निश्चित जाणवेल. महाराष्ट्राचे दोन्ही संघ २६ मार्च रोजी स्पर्धेसाठी मुंबईहून सोनिपतला प्रयाण करतील.

**महिलांचा संघ**

दीपिका जोसेफ (संघनायिका), सायली जाधव, जयश्री साठे, विद्या शिरस, अश्विनी थोरवे, कल्पिता शिंदे, सुस्मिता पाटील, राधाबाई आघाव, भाग्यश्री भोसले, तेजश्री मयेकर, पूजा मछले, अस्मिता माळी, संगीता मोरे, प्रीती रेवाळे. प्रशिक्षक संतोष जाधव, व्यवस्थापक गणेश भोईर.

**पुरुषांचा संघ**

निलेश चिंदरकर (संघनायक), महेश सावकारे, सूरज कांबळे, गणेश काळे, कल्पेश जाधव, अंकुश महाले, कुमार वडार, गोरख पवार, संतोष महाले, सचिन कोळी, रामकीसन महाले, राहुल चव्हाण, गणेश वावरे, करण पवार. प्रशिक्षक आनंद हेगडे, व्यवस्थापक प्रीतम सनकुलकर.

# पनवेलमध्ये मेडन ट्रॉफी चॅम्पियनशीप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल क्रिकेट अ‍ॅकॅडमीच्या वतीने मेडन ट्रॉफी चॅम्पियनशीपचे आयोजन करण्यात आले आहे. तक्का येथे खेळल्या जाणाऱ्या १२ वर्षांखालील मुलांच्या या लेदर बॉल क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन नुकतेच झाले.

उद्घाटन समारंभास नगरसेवक अजय बहिरा, नगरसेविका सुशीला घरत, अकॅडमीचे अध्यक्ष सिद्धार्थ मोहिते, उपाध्यक्ष अंकल बहिरा, रायगड जिल्हा लेदर क्रिकेट १४ वर्षांखालील संघाचे प्रशिक्षक जॉंटी, निवड समिती अध्यक्ष प्रीतम कैय्या व पनवेल क्रिकेट अ‍ॅकॅडमीचे सर्व सभासद व पालकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.





२५ षटकांच्या या स्पर्धेत पहिल्या दिवशी दोन सामने खेळवण्यात आले. पहिल्या सामन्यात रायगड क्रिकेट अ‍ॅकॅडमी खोपोली या संघाने फ्युचर स्टार क्रिकेट क्लिनिक या संघावर मात केली. फ्युचर संघाने रायगड संघाला २५ षटकांत १२७ धावांचे लक्ष दिले होते जे रायगड संघाने तीन गडी राखून पूर्ण केले. फ्युचर संघातर्फे आदर्श राजभार याने २८ धावा केल्या, तर रायगड संघातर्फे आर्यन निकाळजे याने २८ धावा केल्या. रायगड संघाचा अथर्व पाटील सामनावीर ठरला. त्याने तीन विकेट घेतल्या व फलंदाजीत १४ धावा केल्या.

दुसरा सामना पनवेल क्रिकेट अ‍ॅकॅडमी ज्युनियर संघ व करण क्रिकेट अकॅडमी यांच्यात झाला. यामध्ये करणे अ‍ॅकॅडमीने पनवेल अ‍ॅकॅडमीला चार विकेट राखून पराभूत केले. करण अ‍ॅकॅडमीच्या फैज दळवी याने स्पर्धेतील पहिले अर्धशतक झळकताना ५१ धावा केल्या व सामनावीर किताब मिळविला. पनवेल अ‍ॅकॅडमीच्या विघ्नेश पाटील याने ३१ धावा करून एकाकी लढत दिली.

स्पर्धा १० दिवस चालणार असून यात आठ संघ सहभागी होत आहेत. जिंकणाऱ्या संघास पनवेल क्रिकेट अ‍ॅकॅडमी मेडन चषक बहाल करण्यात येणार आहे.

या वेळी बोलताना उपस्थित मान्यवरांनी अ‍ॅकॅडमीचे कोच प्रतिक मोहिते यांचे लेदर क्रिकेटला पुढे नेण्यासाठी केलेल्या प्रयत्नांसाठी आभार मानले तसेच जिल्हा संघात विविध वयोगटांतील पनवेल क्रिकेट अ‍ॅकॅडमीच्या सहा खेळाडूंची निवड झाल्याबद्दल अभिनंदन केले.

# श्रीकांत, कश्यप उपांत्यपूर्व फेरीत





## स्विस खुली बॅडमिंटन स्पर्धा

**बॅसेल : वृत्तसंस्था**

जागतिक अजिंक्यपद रौप्यपदक विजेत्या भारताच्या सातव्या मानांकित किदम्बी श्रीकांतने गुरुवारी फ्रान्सच्या ख्रिस्टो पोपोव्हविरुद्ध रोमहर्षक विजय मिळवत स्विस खुल्या बॅडमिंटन स्पर्धेच्या पुरुष एकेरीची उपउपांत्यपूर्व फेरी गाठली. माजी राष्ट्रकुल सुवर्णपदक विजेत्या पारुपल्ली कश्यपला उपांत्यपूर्व फेरीत पुढे चाल मिळाली आहे.

जागतिक क्रमवारीत १२ व्या क्रमांकावरील श्रीकांतने क्रमवारीत ६०व्या क्रमांकावरील पोपोव्हला एक तास आणि १३ मिनिटे चाललेल्या सामन्यात १३-२१, २५-२३, २१-११ असे पराभूत केले. पुढील फेरीत श्रीकांतची द्वितीय मानांकित डेन अँडर्स अँटनसेनशी होणार आहे.

कश्यपचा प्रतिस्पर्धी ऑलिम्पिक विजेत्या व्हिक्टर अ‍ॅक्सेलसेनने सामन्यातून माघार घेतली. तिसऱ्या मानांकित सात्त्विक साईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी जोडीचे पुरुष दुहेरीच्या दुसऱ्या फेरीत आव्हान संपुष्टात आले. इंडोनेशियाच्या प्रमुद्या कुसुमावर्दना आणि येरेमिआ ईरिच योचे याकोब रॅम्बिटॅन जोडीकडून १९-२१, २०-२२ अशा फरकाने सात्त्विक-चिराग जोडीने पराभव पत्करला.

महिला एकेरीत दुहेरी ऑलिम्पिक पदकविजेत्या पी. व्ही. सिंधूने डेन्मार्कच्या हॉजमार्क काईर्सफेल्डवर सरळ गेममध्ये विजय मिळवत दुसरी फेरी गाठली. माजी विश्वविजेत्या सिंधूने पहिल्या सामन्यात हॉजमार्कवर २१-१४, २१-१२ असा विजय मिळवला. अश्मिता छलिहाने आठव्या मानांकित क्रिस्टी गिल्मॉरकडून १८-२१, २०-२२ अशी हार पत्करली.

महिला दुहेरीत अश्विनी पोनप्पा आणि एन. सिक्की रेड्डी जोडीने स्वित्झर्लंडच्या ऑलिने म्यूलर आणि जेंजिरा स्टेडेलमॅनचा २१-१५, २१-१६ असा पराभव केला. पुरुष दुहेरीत एम. आर. अर्जुन आणि ध्रुव कपिला जोडीने इंडोनेशियाच्या फाजर अल्फियान आणि मुहम्मद रियान अर्डियांटो जोडीकडून १९-२१, १३-२१ अशी हार पत्करली.

## प्रो लीग हॉकीत भारताचे न्यूझीलंड, स्पेनशी सामने

**भुवनेश्वर : वृत्तसंस्था**

भारतीय पुरुष हॉकी संघ नव्या 'एफआयएच' प्रो लीग हॉकी हंगामाचा प्रारंभ न्यूझीलंड आणि स्पेनविरुद्ध लढतींनी करणार आहे. आंतरराष्ट्रीय हॉकी महासंघाने (एफआयएच) ही माहिती दिली.

भारतीय संघ मायदेशात न्यूझीलंड आणि स्पेनविरुद्धचे पहिले सामने अनुक्रमे २८ आणि ३० ऑक्टोबरला खेळणार आहे, तर परतीचे सामने अनुक्रमे ४ आणि ६ ऑक्टोबरला खेळेल. याचदरम्यान न्यूझीलंड आणि स्पेनचे संघ एकमेकांविरुद्धही सामने खेळणार आहे. त्यानंतर पुढील वर्षी मार्च महिन्यात भारतीय संघ जर्मनी आणि ऑस्ट्रेलियाविरुद्ध खेळणार आहे. भारताचे जर्मनी आणि ऑस्ट्रेलियाशी पहिले सामने अनुक्रमे १० आणि १२ मार्चला, तर परतीचे सामने अनुक्रमे १३ आणि १५ मार्चला होतील.

# क्रीडा स्पर्धेत रसायनीतील संघ रौप्यपदकाचा मानकरी

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनीतील ट्रॅक अ‍ॅण्ड फील्ड चॅम्पियन्स क्लबच्या खेळाडूंनी चिपळूण येथे झालेल्या क्रीडा स्पर्धेत घवघवीत यश संपादन केले आहे. त्यांनी डेरवण युथ गेम्स स्टेट मीट २०२२मध्ये १२ वर्षांखालील मुलांच्या वयोगटात ४ बाय १०० मीटर रिले विभागात रौप्यपदक जिंकले.

या संघात आयु अमोल गीध, दर्शन सचिन करवंदे, प्रेम तिप्पण्णा जाधव व भैयालाल पासवान या महाराष्ट्रातील सर्वोत्कृष्ट खेळाडूंना खडतर स्पर्धा देऊन एक अप्रतिम शर्यत पूर्ण केली.

यात निहिरा दिगंबर गीध, आर्वी अनिरुद्ध गीध, अन्वय समीर मोरे, दर्शन सचिन करवंदे, आर्य रामचंद्र पाटील, चैतरंग सचिन मालकर, रूद्र मंगेश पाटील व सुजल दत्तात्रय घरत यांनीही चांगला प्रयत्न केला.

या क्लबचे प्रशिक्षक गुरूनाथ म्हशीलकर यांच्या मार्गदर्शनाखाली खेळाडू प्रशिक्षण घेत आहेत.



# महिला विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत भारताला मोठा विजय आवश्यक

**वेलिंग्टन : वृत्तसंस्था**

आयसीसी महिला क्रिकेट विश्वचषक स्पर्धेची उपांत्य फेरी गाठणारा दक्षिण आफ्रिका हा दुसरा संघ ठरला. साखळी सामना पावसामुळे रद्द करण्यात आल्याने दक्षिण आफ्रिका व वेस्ट इंडिज या दोन्ही संघांना समान एक गुण देण्यात आले. आता भारताला रविवारी (दि. २७) दक्षिण आफ्रिकेविरुद्ध होणाऱ्या अखेरच्या साखळी लढतीत मोठ्या फरकाने विजय आवश्यक आहे.

पावसामुळे हा सामना होऊ शकला नाही, तरी एक गुण भारताच्या पथ्यावर पडू शकतो, कारण वेस्ट इंडिजपेक्षा भारताची निव्वळ धावगती सरस आहे. विंडीजचे सर्व सामने झाले असून ते रविवारी होणाऱ्या लढतीत आफ्रिकेचा संघ जिंकावा अशी प्रार्थना करतील.

भारताने आतापर्यंत झालेल्या सामन्यांपैकी तीन विजय मिळवत एकूण सहा गुणांसह गुणतालिकेत चौथ्या स्थान राखले आहे. भारताने पाकिस्तान, विंडीज आणि बांगलादेशला हरवले आहे.

**भारताचे उपांत्य फेरीचे समीकरण**

दक्षिण आफ्रिकेवर विजय मिळवल्यास भारताचे उपांत्य फेरीतील स्थान पक्के होऊ शकते.

हा सामना रद्द झाल्यास भारत हा वेस्ट इंडिजपेक्षा सरस निव्वळ धावगतीच्या आधारे उपांत्य फेरीसाठी पात्र होईल.

हा सामना गमावल्यास इंग्लंड आणि बांगलादेश लढतीकडे भारताचे लक्ष असेल. यात बांगलादेशने इंग्लंडला मोठ्या फरकाने पराभूत करावे लागेल.

# व्यावसायिक महिला गट कबड्डी स्पर्धेत आता सेमीफायनलचा थरार

**मुंबई : प्रतिनिधी**

पश्चिम रेल्वे, बृहन्मुंबई महानगरपालिका, बँक ऑफ बडोदा यांनी सिद्धी स्पोर्ट्स क्लब आयोजित व्यावसायिक महिला गट कबड्डी स्पर्धेच्या उपांत्य फेरीत धडक दिली. पश्चिम रेल्वे विरुद्ध बृहन्मुंबई महानगरपालिका, बँक ऑफ बडोदा विरुद्ध एमराल्ड द इन्फ्रास्ट्रक्चर अशा उपांत्य लढती होतील.



सायन प्रतीक्षा नगर येथील तांडेल कनोजी आंग्रे क्रीडांगणावर सुरू असलेल्या पहिल्या सामन्यात प. रेल्वे या मातब्बर संघाने जानकी रामचंद्र कल्याण केंद्राचा ५३-१९ असा सहज पराभव केला. पहिल्या डावात २७-९ अशी आघाडी घेणाऱ्या रेल्वेने दुसऱ्या डावातदेखील तोच जोश कायम ठेवत ३४ गुणांच्या मोठ्या फरकाने उपांत्य फेरी गाठली. आंतरराष्ट्रीय खेळाडू सोनाली शिंगतेच्या झंजावाती खेळाने ही किमया साधली. पकडीत तिला ईश्वरी कोंढाळकरची उत्तम साथ लाभली. कल्याण केंद्राच्या ऐश्वर्या ढवण, सरिता बऱ्या खेळल्या.

दुसऱ्या सामन्यात बृहन्मुंबई महानगरपालिकेने दत्ता इंटरप्राइजेसचा ३५-२४ असा पाडाव केला. रुचिता पाटीलच्या चतुरस्त्र खेळाने मुंबई पालिकेने पूर्वार्धातच १९-१२ अशी आघाडी घेतली होती. उत्तरार्धात सावध खेळ करीत आपल्या विजेतेपदावर शिक्कामोर्तब केले.

शेवटच्या सामन्यात बलाढ्य बँक ऑफ बडोदा संघावर ६५-१० अशी लीलया मात केली. पूजा यादव, हरजित कौर यांच्या तुफानी चढाया त्यांना ऋतुजा बांदिवडेकरची मिळालेली पकडीची भक्कम साथ यामुळेच बँकेने मध्यांतरालाच ३४-३ अशी मोठी आघाडी घेतली होती. त्यानंतर ५५ गुणांनी विजय साकारला.

# उरणचा जलतरणपटू आर्य पाटीलने मांडवा ते गेट वे अंतर केले पार



**उरण : बातमीदार**

उरण तालुक्यातील केगाव दांडा येथील १० वर्षीय जलतरणपट्टू आर्य किशोर पाटील याने नुकतेच मांडवा ते गेट ऑफ इंडिया हे १८ किमी अंतर पाच तास ३१ मिनिटांत पोहून पार केले.

आर्य हा उरणमधील सेंट मेरीज हायस्कूलमध्ये इयत्ता पाचवीत शिकत आहे. आर्यने २३ मार्च रोजी सकाळी ५.२५ वाजता मांडवा येथून समुद्रात उडी मारली आणि समुद्राच्या लाटांना झुंज गेट वेपर्यंतचे अंतर पार केले. त्याच्या या पराक्रमात वडील राष्ट्रीय जलतरणपटू किशोर पाटील आणि प्रशिक्षक हितेश भोईर यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

या कामगिरीबद्दल सर्व स्तरातून आर्य पाटीलचे कौतुक करण्यात येत असून आर्यच्या नातेवाईकांनी, मित्रपरिवार, चाहत्यांनी व विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्याचे अभिनंदन करीत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com